कृषीवल
रायगड, शुक्रवार, दि. २५ ऑक्टोबर २०२४
किंमत ४₹

## ‘दाना’ चक्रीवादळ धडकणार?

**बंगाल :** ‘दाना’ चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर ओडिशा आणि बंगालमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. ‘दाना’ ओडिशात धडकू शकते आणि उद्या पश्चिम बंगालच्या किनारपट्टीला धडकण्याची शक्यता आहे. या काळात ताशी १२० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. वादळाच्या आगमनामुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. ‘दाना’ चक्रीवादळामुळे ओडिशा आणि बंगालच्या अनेक भागात जोरदार वाऱ्यासह पाऊस पडत आहे.या वादळामुळे ५०० हून अधिक गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. विमानांना १६ तासांसाठी बंदी घालण्यात आली आहे. एनडीआरएफच्या ५० हून अधिक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.

## छगन भुजबळांच्या घरात बंडखोरी

**नाशिक :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रातले दिग्गज नेते छगन भुजबळ यांच्या घरात बंडखोरी झाली आहे. त्यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्ष सोडत अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. सुहास कांदे यांच्या विरोधात आता समीर भुजबळ निवडणूक लढवतील. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही घडामोड राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासाठी मोठा धक्का मानली जाते आहे. छगन भुजबळ हे अजित पवारांच्या निकटवर्तीयांपैकी एक मानले जातात. हेच छगन भुजबळ समीर भुजबळ यांची बंडखोरी रोखू शकलेले नाहीत. त्यामुळे आता इथली निवडणूक चुरशीची होणार यात काही शंकाच नाही. काही दिवसांपूर्वी पंकज भुजबळ यांना विधानपरिषदेवर आमदार म्हणून निवडण्यात आलं. त्यानंतर नांदगावमधून समीर भुजबळ यांना तिकिट मिळेल अशी चर्चा होती. मात्र तसं घडलं नाही.

५वी ते ९वीच्या मराठी/सेमी इंग्लिश आणि CBSE पॅटर्नच्या विद्यार्थ्यांसाठी ‘टॅलेंट सर्च’ परीक्षा
MKCL OLYMPIAD MOVEMENT
प्रवेशाची अंतिम तारीख दि. २० नोव्हेंबर
सर्व विषयांच्या पहिल्या सत्राचा अभ्यासक्रम व व्यक्तीमत्व विकास यावर आधारित १ तासाची परीक्षा
इयत्तावार परीक्षा व आकर्षक बक्षिसे
www.mkcl.org/mom
परीक्षेसाठी नजीकच्या MS-CIT/ क्लिक् सेंटरमध्ये नोंदणी करा 8956537496

# चित्रलेखा पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी गुरुवारी (दि.२४) दुपारी अलिबागमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील यांनीदेखील उमेदवारी अर्ज उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्याकडे दिला.**


(छायाचित्र : समीर मालोदे)

चित्रलेखा पाटील यांचे अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे आगमन होताच ‘चिऊताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, लाल बावटे की जय, लढेंगे जितेंगे’ अशा घोषणा दिल्या. चित्रलेखा पाटील यांचे यावेळी शेकाप भवनमध्ये औक्षण करण्यात आले.

शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप राज्य कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, ॲड. राजन पाटील, ॲड. निता पाटील, शैला पाटील, साधना पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, अलिबाग पंचायत समितीच्या माजी सभापती विद्या म्हात्रे, प्रमोद ठाकूर, रायगड जिल्हा महिला बचत गट फेडेरेशनच्या उपाध्यक्षा तथा अलिबाग नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका वृषाली ठोसर, अश्विनी पाटील, संजना कीर, संदीप शिवलकर, अनिल चोपडा, अक्षय्या नाईक, सुरेश घरत, प्रफुल्ल पाटील, नागेश कुलकर्णी, राकेश चौलकर, ॲड. सचिन जोशी, अनिल पाटील, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, खंडाळेचे सरपंच नासिकेत कावजी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.

चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांचे अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे आगमन होताच त्यांचे कार्यकर्त्यांनी जल्लोषात स्वागत केले. कार्यकर्त्यांसह महिलांनी भवनसमोर गर्दी केली होती. चित्रलेखा पाटील यांनी जिल्ह्यात २५ हजार सायकली मुलींना गावोगावी दिल्या आहेत. या सायकलवर बसून अनेक गावे, वाड्यांमधील मुली शाळेत जात आहेत. प्रगती व बदलाचे स्वरुप असलेल्या सायकवर स्वार होऊन चित्रलेखा पाटील उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत दाखल झाल्या. गुरुवारी २४ ऑक्टोबर रोजी सायकल चालवून मोजक्याच शेकापच्या महिला पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या सोबतीने उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक अधिकारी मुकेश चव्हाण यांच्याकडे उमेदवारी अर्ज दाखल केला.



## पेझारीत प्रचाराला सुरुवात

शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत विधानसभेच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ गुरुवारी (दि.२४) पेझारीत नारळ वाढवून करण्यात आला. अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील यांच्या हस्ते शेकापच्या संपर्क कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले.


● (छायाचित्र : अमोल नाईक)

यावेळी रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती बाळूशेट पाटील आदी शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.

शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांची शेकाप नेते जयंत पाटील यांनी उमेदवारी जाहीर केली. त्यानंतर कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. चित्रलेखा पाटील यांच्या उमेदवारीने कार्यकर्ते विशेषतः महिला वर्गात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शेकापचे कार्यकर्ते कामाला लागले आहे. मतदारांपर्यंत पोहचण्यास कार्यकर्त्यांनी सुरुवात केली आहे. गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाण्या अगोदर चित्रलेखा पाटील यांनी पेझारी येथील निवासस्थानी भेट दिली. यावेळी एक वेगळा उत्साह निर्माण झाला.

### ‘जनहितासाठी प्रतिनिधीत्व करणार’

**बदलत्या राजकारणामुळे महिला, तरुण पिढी, गोरगरीब जनता दुर्लक्षित झाले आहेत. अलिबाग विधानसभा मतदार संघातून भरलेला उमेदवारी अर्ज हा सुशिक्षित, गोरगरीब जनतेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी, त्यांच्या विकासासाठी, शिक्षणाला प्रगतीवर नेणारा आणि मुली, महिला यांच्यासाठी आशावादी असणारा आहे. भविष्यात जनतेच्या हितासाठी प्रतिनिधीत्व करणार, असा विश्वास शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख तथा शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी व्यक्त केला. त्या पुढे म्हणाल्या, सायकलचे** •> पान २ वर

## पेझारी निवासस्थानी भेट


चित्रलेखा पाटील यांनी पेझारी येथील निवासस्थानी जाऊन स्व.नारायण नागू पाटील, स्व.प्रभाकर पाटील, स्व.सुलभा पाटील व स्व. मीनाक्षी पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. तसेच मीनाक्षीताईच्या आठवणींना उजाळा दिला.


● चित्रलेखा पाटील यांचे औक्षण करताना शैला पाटील.

## वेधक

### जिल्ह्यात आज सहा नामनिर्देशनपत्र दाखल

**रायगड :** विधानसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशन भरण्यास सुरुवात झाली आहे. आज नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदारसंघापैकी अलिबाग, महाड, पेण आणि उरण मतदारसंघात सहा उमेदवारांची नामनिर्देशनपत्र दाखल झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे. १९४-महाड विधानसभा मतदार संघामध्ये गुरूवारी भरत मारुती गोगावले यांनी १ नामनिर्देशन पत्र सादर केले.१९२-अलिबाग विधानसभा मतदार संघामध्ये उमेदवारांची ३ नामनिर्देशन पत्र सादर झाली •> पान २ वर

### पाथरशेतच्या मंदिरावरील कळस कोसळला

**कोलाड :** पाथरशेत गावापासून ८०० मीटर अंतरावर श्री भैरवनाथ मंदिर आहे. या मंदिरावर मंगळवारी (दि.२२) मध्यरात्रीच्या सुमारास मंदिरावरील कळस कोसळला. हा कळस वीज पडल्याने कोसळला की, वैयक्तिक वादामुळे पाडला, याबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. रात्री ढगांच्या कडकडासह पाऊस झाल्याने मंदिरावर वीज कोसळली असावी, असा ही अंदाज वर्तविला जात आहे.गावचे पुजारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास पूजेसाठी मंदिरात आले असता त्यांना हा प्रकार दिसला. त्यांनी तात्काळ गावात जाऊन ग्रामस्थांना सांगितले व लगेच कोलाड पोलीस ठाणे येथे सांगितले. कोलाड पोलीस ठाणे •> पान २ वर

### पनवेल रेल्वेस्थानकाचा होणार पुनर्विकास

**पनवेल :** प्रवाशांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून मोठ्या प्रमाणावर रेल्वे स्थानकांचे अपग्रेडेशन करून भारतीय रेल्वेमध्ये एक मोठे परिवर्तन सुरू आहे. अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत मध्य रेल्वेवरील रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील स्थानकाचा विकास केला जाणार आहे.ऑगस्ट २०२३ आणि फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रातील अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत ७६ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाची पायाभरणी केली तेव्हा या अभियानाला मोठी चालना मिळाली होती. •> पान २ वर

## स्नेहल जगताप सोमवारी अर्ज दाखल करणार

### आदित्य ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड, माणगाव, पोलादपूर विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीकडून स्नेहल जगताप यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. स्नेहल जगताप सोमवारी (दि.२८) अर्ज दाखल करणार असून यावेळी आदित्य ठाकरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहे. याच सभेमध्ये माणगावचे चंद्रशेखर खानविलकर हे असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश करत असल्याची माहिती पक्षाचे प्रवक्ते धनंजय देशमुख यांनी दिली.


शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून पक्ष कार्यालयामध्ये गुरुवारी •> पान २ वर




## चिपी-मुंबई विमानसेवा बंद

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**

ऐन दिवाळीच्या तोंडावरच प्रवाशांना फटका बसणार आहे. चिपी-मुंबई विमानसेवा २६ ऑक्टोबरपासून बंद होणार आहे. चिपी-मुंबई विमानसेवा तीन वर्षांसाठी करार पद्धतीने सुरू करण्यात आली होती. मात्र त्याची मुदत येत्या २६ ऑक्टोबर रोजी संपणार असल्याने हवाई प्रवासाची तिकीट विक्री २६ तारखेपासून बंद होणार आहे.



तब्बल २० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर ९ ऑक्टोबरपासून सिंधुदुर्गातील चिपी परुळे विमानतळावरून प्रवासी विमान सेवा सुरु झाली होती. सिंधुदुर्गवासीयांसाठी ही निश्चितच मोठी खुशखबर होती. हे विमानतळ सिंधुदुर्गाची शान ठरली होती. ज्योतिरादित्य सिंधिया, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत चिपी विमानतळाचं उद्‌घाटन मोठ्या धुमधडाक्यात पार पडले होते.

### नागरिकांकडून नाराजी

**दरम्यान, चिपी-मुंबई या विमानसेवेला प्रवासी वर्गाचा सकारात्मक प्रतिसाद होता. मात्र आता ऐन निवडणुकीच्या काळात ही विमानसेवा बंद होत आहे. सामान्य जनता या विमान सेवेच्या लाभापासून वंचित राहणार असल्यामुळे अनेक नागरिकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.**

### ऐन दिवाळीत प्रवाशांना ‘दे धक्का’

**ही विमानसेवा तीन वर्षांसाठी करार पद्धतीने सुरू करण्यात आली होती. त्याची मुदत येत्या २६ ऑक्टोबर रोजी संपणार आहे. एअर इंडियाच्या अलायन्स एअर या उपकंपनीमार्फत सिंधुदुर्ग ते मुंबई आणि मुंबई ते सिंधुदुर्ग मार्गावर विमानसेवा सुरू होती. त्यामुळे ऐन दिवाळी आणि विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फटका बसणार आहे.**

## घरगुती वादातून केली हत्या

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

घरगुती वादातून लाकडी दांडक्याने आणि हत्याराने डोक्यावर मारहाण करून ४५ वर्षीय महिलेची हत्या केल्यापकरणी आरोपी कमळ्या राघो निरगुडा (वय ५५, रा.टावरवाडी, पनवेल) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्या झालेली महिला शनिवारी गोमा निरगुडा (वय ४५, टावरवाडी) यांच्या पतीचे निधन झाले आहे. तर आरोपी याने त्याच्या पत्नीची यापूर्वी २००८ मध्ये हत्या केली आहे. याप्रकरणी हील लाईन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल आहे. आरोपी कमळ्या निरगुडा हा जेलमधून सुटून आल्यानंतर मृत महिलेसह ते दोघे एकत्र राहत होते. आरोपीला दारूचे व्यसन असल्याने तो निरगुडा यांना दारू पिऊन मारहाण करत असे. २२ ऑक्टोबर रोजी आरोपीने मृत महिलेला लाकडी दांडक्याने आणि हत्याराने डोक्यावर हातावर, पोटावर, पायावर, मारहाण केली. यात ती गंभीर जखमी झाली व त्यात तिचा मृत्यू झाला. पोलिसांनी आरोपी कमळ्या निरगुडा याला अटक केली.

### विधानसभा आचारसंहितेमुळे भरती प्रक्रियेला लागला ब्रेक

# विद्यार्थ्यांना शिकवणार कंत्राटी शिक्षक

**। सुयोग आंग्रे ।**
**। रायगड।**

रायगड जिल्हा परिषदेच्या ज्या शाळांची पटसंख्या दहा किंवा त्यापेक्षा कमी आहे, त्या शाळांवर आता प्रत्येकी एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या सुमारे साडेपाचशे शाळांचा पट दहापेक्षा कमी आहेत. यामुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाची जबाबदारी कंत्राटी शिक्षकांवर देण्यात येणार आहे. पण, विधानसभा निवडणुकीनंतर त्याची कार्यवाही होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक भरतीनंतरही जिल्हा परिषदेच्या शाळांना अजूनहीशिक्षक (मराठी, उर्दु, कन्नड माध्यम) कमी आहेत. शाळांना पटसंख्येच्या प्रमाणात शिक्षक नसल्याने जिल्ह्यातील जवळपास साडेपाचशे शाळांमधील पदे समानीकरणात अडकली आहेत. आरटीईनुसार ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असावा, असा नियम आहे. पण, त्यानुसार सर्वच शाळांमध्ये कार्यवाही झालेली नाही.या पार्श्वभूमीवर पूर्वी २० पेक्षा कमी पटाच्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक नेमण्याचा निर्णय झाला. या निर्णयात पुन्हा बदल करण्यात आला आणि आता नवीन निर्णयानुसार १० पेक्षा कमी पटाच्या शाळांवर डीएड- बीएडधारक सुशिक्षित बेरोजगार तरूणांना कंत्राटी पद्धतीने नेमले जाणार आहे. त्यांची नियुक्ती पहिल्यांदा एकाच वर्षासाठी असणार असून त्यानंतर त्यांना पुढे संधी द्यायची की नाही याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक शिक्षणाधिकारी घेणार आहेत.




**२०२४ या शैक्षणिक वर्षाची संचमान्यता करताना आधार व्हॅलिड पटसंख्याच ग्राह्य धरावी, असे शालेय शिक्षण विभागाचे आदेश होते. पण, शिक्षक संघटनांच्या मागणीनंतर या निर्णयातून सवलत देत आधारव्हॅलिड पटावरील १० टक्के विद्यार्थी शाळेत आहेत. पण त्यांचे आधारकार्ड नाही. त्यांचाही विचार केला जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे पटसंख्येअभावी अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण कमी होणार आहे. पण, हा निर्णय कायमचा नसून यापुढे आधार व्हॅलिड पटसंख्याच ग्राह्य धरली जाईल, असेही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.**

> **“ ज्या शाळांची पटसंख्या दहा किंवा त्याहून कमी आहे, त्या शाळांमधील पटसंख्या मागविली आहे. शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार त्या शाळांवर कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. त्या शाळांवरील नियमित दोनपैकी एका शिक्षकाची दुसऱ्या शाळेवर बदली करावी लागणार आहे. निवडणुकीमुळे हे शक्य नसल्याने डिसेंबरमध्ये त्याची कार्यवाही होईल.**
> **– पुनिता गुरव, प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, रायगड . ”**



# नागोठणे पोलिसांच्या कारवाईत गावठी दारूची हातभट्टी उध्वस्त

**● आरोपी मात्र मोकाट ●५२ हजार रुपयांचे १४०० लिटर रसायन केले नष्ट ● तयार गावठी दारुही नष्ट**

**। नागोठणे । वार्ताहर ।**
**नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दितील सुकेळी, वाघ्रणवाडीवरील डोंगराळ भागात व जंगल परिसरातील सुरु असलेल्या गावठी दारूच्या हातभट्टी नागोठणे पोलिसांच्या पथकाने उध्वस्त केल्या आहेत. गावठी दारु विरोधी मोहिमेचाच एक भाग म्हणून नागोठणे पोलीस ठाण्याचे स. पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाणे अंमलदार व पथकाने रविवारी (दि.२०) सकाळी धाड टाकून अवैधरित्या सुरु असलेल्या गावठी दारूच्या हातभट्ट्या उध्वस्त करुन सुमारे ५२ हजार ४०० रूपये किंमतीचे रसायन व दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य नष्ट केले. महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिसांनी ही कारवाई केली.**




दरम्यान यापूर्वीही अनेकवेळा नागोठणे पोलिसांकडून परिसरातील गावठी दारूच्या हातभट्टी नष्ट करण्यात आल्या आहेत. असे असले तरी याप्रकरणी हातभट्टी लावणारे आरोपी घटनास्थळावरून पळून जात असल्याने ते मोकाटच असतात. त्यांचा तपास लावण्यात पोलीस यंत्रणेला अपयश येत असल्यानेच पुन्हा पुन्हा या गावठी दारूच्या हातभट्टी सुरु होत आहेत.

नागोठणे पोलिसांच्या या धाडीत सात प्लास्टिक टाक्यांमध्ये प्रत्येकी २०० लिटर असे ४९ हजार रुपये किंमतीचे १४०० लिटर रसायन, प्रत्येकी २०० रुपये किमतीच्या एकूण १४०० रुपये किंमतीच्या सात प्लास्टिक टाक्या तसेच रुपये २००० किंमत असलेली २० लिटर तयार गावठी दारू व सर्व मुद्देमाल वाहतुकीस अवजड व अवघड असल्याने हा मुद्देमाल जागीच नष्ट करून पेटवून देण्यात आला. या मोहिमेत नागोठणे पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. दरम्यान नागोठणे पोलीस ठाणे परिसरात पोलीस पथकाने १५ ऑक्टोबरपासून ६ ठिकाणी छापे टाकून ६ केसेस दाखल केल्या आहेत.

दरम्यान नागोठणे पोलिसांनी सुरु केलेल्या गावठी दारु विरोधी मोहिमेचे संपूर्ण नागोठणे विभागातील जनतेकडून स्वागत करण्यात येत असून पोलिसांनी या गावठी दारु माफियांचा कायमचा बंदोबस्त व नायनाट करुन गावठी दारुला नागोठणे विभागातून हद्दपार करुन त्रस्त झालेल्या महिला वर्गाचे आशीर्वाद मिळवावेत व त्यांना दिलासा द्यावा अशी मागणीही नागरिकांतून होत आहे.

## ‘भाताच्या नुकसानीची पंचनामे करा’



**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील भातशेतीचे परतीच्या पावसाने मोठे नुकसान केले आहे.त्यामुळे शेतीच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी किसान क्रांती संघटना यांनी केली आहे.प्रांत अधिकारी यांना सादर केलेले निवेदनात किसान क्रांती संघटनेकडून ही मागणी करण्यात आले आहे.

ऑक्टोबर महिना संपत आला तरी परतीचा पाऊस तालुक्याचे वेगवेगळ्या भागात हजेरी लावत आहे.त्यामुळे भाताची शेती पावसाच्या पाण्यात भिजत असून भाताच्या शेतीचे मोठे नुकसान परतीच्या पावसाने केले आहे.कर्जत तालुक्यातील भातशेतीचे नुकसान झाल्यामुळे शेतकर्‍यांना नुकसान भरपाई मिळावी या मागणीसाठी किसान क्रांती संघटनेने तहसीलदार आणि प्रांत अधिकारी तसेच कृषी अधिकारी यांना निवेदन दिले आहे. परतीच्या पावसामुळे उभे असलेले भात पीक शेतात कापण्याआधीच जमिनीवर पडले आहे.त्यामुळे शेतकर्‍यांचे मोठे नुकसान झाले आहे.यासाठी सरसकट पंचनामे करून शेतकर्‍यांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी संघटनेने केली आहे. त्यात रायगड जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक तालुक्यात पंचनामे करण्याच्या सूचना या आधीच तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या आहेत.

तालुका स्तरावर भाताच्या शेतीचा नुकसानीचे पंचनामे कृषी विभाग,महसूल विभाग आणि पंचायत समिती यांच्याकडून सुरू आहेत अशी माहिती किसान क्रांती संघटनेच्या पदाधिकारी यांनी कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी दिली. किसान क्रांती संघटनेकडून कर्जत उप विभागीय अधिकारी तसेच कृषी अधिकारी यांच्या कार्यालयात जावून भाताच्या नुकसानाची भरपाई देण्यासाठी सरसकट पंचनामे करण्यात यावेत अशी मागणी केली आहे.

किसान क्रांती संघटनेचे संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष उत्तम शेळके, भरत राणे,रामदास माळी, भाऊ खानविलकर, प्रकाश कांबेरे, मोरेश्वर भगत, सुरेश जाधव, विनायक देशमुख, अरुण शेळके, सदस्य रवींद्र गावंड, रोहिदास बडेकर, मंगेश बडेकर आदी उपस्थित होते.

## सुदर्शनचा महाडमधील पत्रकारांसाठी ‘हास्य योग’

**। महाड । वार्ताहर ।**
या भूतलावर मनुष्य हा एकमेव प्राणी आहे की जो भरभरून हास्य करतो आणि त्यातून मनसोक्त आनंद मि ळवतो. हसण्यातून जीवनाला आनंद मिळतो, यामुळे सभोवतालच्या वातावरणातून सकारात्मक ऊर्जा आपल्याला मिळते, यासाठीच हास्ययोग हा आनंद जीवन जगण्याचा मूलमंत्र आहे असे मत पुणे येथील हास्य योग प्रशिक्षक मकरंद टिल्लू यांनी सुदर्शन कंपनीने पत्रकारांसाठी आयोजित केलेल्या हास्ययोग कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

महाड येथील सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीतर्फे पत्रकार स्नेह मेळावा व संवाद सन्मान कार्यक्रमाचे आयोजन येथील हॉटेल विसावाच्या सभागृहामध्ये केले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून हास्ययोग प्रशिक्षक मकरंद टिल्लू उपस्थित होते. त्यांनी हसण्यातून जीवनाला एक नवी दिशा मिळत असल्याचे सांगताना आनंदी वातावरणामुळे माणसाच्या जीवनामध्ये निर्माण झालेल्या समस्या सहजगत्या सोडवण्यासाठी मदत मिळते. यावेळी त्यांनी हसण्यातून ऊर्जा निर्माण करण्यासाठी प्रात्यक्षिक करून दाखवले. गेल्या अनेक वर्षापासून आपल्या घराण्यात हास्य योग प्रशिक्षणाचे कार्यक्रम सादर करीत आहोत.आत्तापर्यंत लाखो लोकांना आनंदी जीवनाचा मूलमंत्र मिळाला, त्याचा मनस्वी आनंद होत असल्याची त्यांनी सांगितले.

## किराणा दुकानात दारू विक्री

**नवीन पनवेल :**
किराणा दुकानात दारू विक्री केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात हरीश हरिश्चंद्र पाटील यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांच्याकडून ४३ हजार ३६५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. २२ ऑक्टोबर रोजी खारघर पोलिसांना धनश्री किराणा स्टोअर सेक्टर १३, खारघर या ठिकाणी देशी विदेशी दारूची विक्री होत असल्याची माहिती मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा, नवी मुंबई यांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी विविध प्रकारचे मद्य सापडून आले. यावेळी दारू विक्रीचा परवाना नसल्याचे सांगण्यात आले.

## दिवाळीसाठी सप्तरंगी रांगोळी बाजारात उपलब्ध

**। पनवेल । वार्ताहर ।**
दिवाळी म्हटल्यावर सगळीकडे रोषणाई आणि रंगीबेरंगी रंग आलेच. दिवाळी आली की, बाजारात आकर्षित करणारी रांगोळी दिसू लागते. रांगोळी म्हटल्यावर डोळ्यांसमोर आपोआपच एक रंगीत आकृती समोर येते. औरस-चौरस तर कधी टिपक्यांची रांगोळी दारासमोर अतिशय आकर्षक दिसते. त्यामुळे अशा सप्तरंगाच्या रांगोळ्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

दिवाळी सणाला प्रत्येकाच्या दारात रांगोळी काढली जाते. आधी सडा शिंपण करुन रांगोळी काढली जायची. मात्र, काळानुरुप आधुनिकीकरण वाढल्याने सिमेंटीकरण झाले. त्यामुळे अशा रांगोळी काढण्याची पध्दत देखील बदलत गेली. महाराष्ट्रात ठिपके काढून जोडण्याची प्रथा होती. पण, आता रांगोळी काढण्यासाठी रेडिमेड सामान उपलब्ध झाले आहे. रांगोळी काढण्यासाठी आवश्यक असणारे छाप, रांगोळी पेन, पाऊलखुणा आणि कागदी छाप बाजारात उपलब्ध झाले आहे. ३० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत असे छाप मिळत आहे. या छाप्याने रांगोळी काढण्यासाठी लागणारी मेहनत कमी केली आहे. बाजारपेठेमध्ये आता रंगीत रांगोळी उपलब्ध झाल्याने रांगोळीचे रंग तयार करण्याचा त्रास कमी झाला आहे. त्यामुळे महिला वर्गांचा रंगीबेरंगी रांगोळी खरेदी करण्याकडे कल वाढत आहे. पांढरी रांगोळी बाजारात वर्षभर उपलब्ध असते. यामध्ये आपल्या आवडीनुसार वेगवेगळे रंग मिसळून रंगीत रांगोळी तयार केली जाते आणि रांगोळीच्या डिझाईनमध्ये रंग भरले जातात; परंतु आता बाजारपेठेत तयार रंगीत रांगोळी आली आहे. निळा, हिरवा, लाल, भगवा, गुलाबी अशा रांगोळीच्या असंख्य छटा ५० ते ६० रुपये प्रतिकिलो दराने बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. त्याबरोबरच विविध प्रकारचे तयार छाप बाजारात विक्रीस उपलब्ध आहेत.

### स्टिकर रांगोळी...

**स्टिकरची रांगोळी, रेडिमेट प्रिंटेड रांगोळी असून हव्या त्या जागी फक्त चिकटवायची असते. या स्टिकरमुळे वेळ वाचतो. तसेच रांगोळी मोडण्याची, खराब होण्याची शक्यता नसते. सध्या बाजारात लक्ष्मीच्या पावलांचे स्टिकर्स, तोरण रांगोळीचे स्टिकर्स तर अगदी छोटे रांगोळीचे स्टिकर्स १० रुपयांपासून उपलब्ध आहेत. तर मोठ्या रांगोळीचे स्टिकर्स ३०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. यातही आता स्टोन लावलेले, थ्री डी मधील रांगोळीला पसंती मिळत आहे.**

### रांगोळीच्या पुस्तकांना मागणी...

**सध्या बाजारात रांगोळीच्या पुस्तकांना देखील मागणी वाढली आहे. कागदी ठिपल्याची कागददेखील बाजारात विक्रीसाठी आले आहेत. रांगोळी या पुस्तकांमध्ये ५ ठिपक्यांपासून ते ३० ते ४० ठिपक्यांच्या डिझाईन पहायला मिळतात. संस्कार भारतीच्या रांगोळीच्या डिझाईन्सदेखील सोप्या पध्दतीने असल्याने त्या अनेकांना सहज काढता येतात.**

## गाडी मागे घेताना धक्का लागल्याने झाला मृत्यू

**नवीन पनवेल :**
गाडी मागे घेत असताना चाकाचा धक्का लागल्याने ४६ वर्षी शकील हबीब अहमद यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२० ऑक्टोबर रोजी चार चाकी ट्रोला (गाडी क्रमांक एम एच ४६ बी यु २१९७) वरील चालकाने गाडी मागे घेत असताना वाहनाच्या चाकाचा धक्का शकील हबीब अहमद यांना लागला. या धडकेत त्यांना हाताला आणि शरीराला गंभीर दुखापती झाल्या. त्यांना एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल करण्यात आले. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# पेण नगरपालिकेत प्रशासकीय राजवटीमुळे मनमानी कारभार

**। पेण । प्रतिनिधी ।**
डिसेंबर २०२१ पासून पेण नगरपालिकेवर प्रशासक बसल्याने लोकप्रतिनिधी आणि नगरपालिकेचा काहीच संबंध राहिलेला नाही. त्यामुळे अधिकारी वर्ग आणि ठेकेदार हे संघनमताने मनमानेल तसे कारभार करत आहेत. एकंदरीत अधिकारी वर्गाला सर्वसामान्यांच्या व्यथांचे काहीही पडलेले नाही. गेल्या महिन्यात वेगवेगळया राजकीय पक्षांनी एक सोडून दोन-दोन वेळा नगरपालिकेवर ठिय्या आंदोलन झाले. असे असताना देखील, अधिकारी वर्गाला जाग येत नाही. आजच्या घडीला पेण नगरपालिकेचे कारभार म्हणजे आंधळा दळतोय आणि कुत्रा पीठ खातोय असेच चालू आहे.



अंतोरा रोडवर अतिशय सुंदर स्थितीत डीवायडरमध्ये असलेले पामची झाड आणि बोगनवेल, करनटोप, फुलोरा या सारखी छोटी रोप बहरलेली होती. त्यातच पथदिव्यांच्या पोलांना लावलेली तिरंगी लाईट ही कळत-नकळत त्या रस्त्याचे सौंदर्य वाढवत आहे. परं अंतोरा रोडवरील डीवायडर तोडून त्यातील छोटी वाढलेली रोप व पामचे झाड जेसेपीच्या सहाय्याने डीवायडर तोडून काढून टाकलेला आहे. या विषयी पेण नगरपालिकेचे बांधकाम अभियंता सुहास कांबळे यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, डीवायडर तोडल्याचे मला काहीही माहीत नाही. अथवा नगरपालिकेमध्ये डीवायडर तोडण्याची कोणतीच परवानगी घेतलेली नाही. त्यावर आम्ही कायदेशीर पोलीस तक्रार करतो. परंतु नगरपालिकेच्या मालमत्तेची अशा प्रकारे नुकसान होत असेल तर आणि अधिकार्‍यांना माहित नसेल तर ही बाब समजण्या पलिकडची आहे. महत्त्वाची बाब म्हणजे अभियंता सुहास कांबळे हे पोलिसांकडे तक्रार कुणाविरूध्द करणार या विषयी त्यांनी बोलण्यास टाळले.

रस्त्याच्या पलिकडे जाण्यासाठी दोन ठिकाणी डिवायडर या अगोदरच ज्यावेळी डिवायडर टाकले त्यावेळी ये-जा करण्याचा मार्ग ठेवला होता. मग आता डीवायडर फोडण्यामागचे नक्की कारण काय? अथवा कुणाच्या फायदयासाठी हे डिवायडर तोडून वाढलेल्या झाडांना मुळासकट काढले. एकंदरीत ही सर्व बाब नगरपालिकेच्या अधिकार्‍याच्या आशिर्वादाशिवाय होऊ शकत नाही. कारण रस्त्याच्या दुसर्‍या बाजुला असलेल्या एका व्यापाराच्या स्टिल गोडाऊनमध्ये माल वाहतूक गाड्या जाण्याच्या उद्देशानेच हा डिवायडर तोडला आहे. अशी चर्चादेखील दबक्या आवाजात तेथे होत होती. घटनास्थळी जाऊन आमच्या प्रतिनिधींनी विचारणा केली असता कुणीही बोलायला तयार नव्हते. मात्र समोर असणाऱ्या दुकांनामध्ये असलेले सीसीटीव्ही पाहता नक्की हा डीवायडर कुणासाठी फोडला आणि कुणी फोडला हे स्पष्ट होईल. परंतु जर अधिकारी वर्गाचा आर्शीवाद हे डीवायडर तोडण्यासाठी असेल तर नक्कीच पोलीस तक्रार होणार नाही.

अंतोरा रोडवरील डीवायडर तोडण्याबाबत मुख्याधिकारी तथा प्रशासक जीवन पाटील यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, अंतोरा रोडवर काय झालेले आहे. याबाबत मला काहीही कल्पना नाही. परंतु, बांधकाम अभियंता सुहास कांबळे यांना याबाबत चौकशी करण्यास सांगतो आणि कायदेशीर कारवाई करतो. नगरपालिकेच्या प्रॉपटीला नगरपालिकेची परवानगी न घेता जर कुणी हानी पोहोचवत असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही, असे मुख्याधिकारी तथा प्रशासक जीवन पाटील म्हणाले.

## राजकीय जाहिरातींचे पूर्वप्रमाणीकरण आवश्यक

**जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे आवाहन**

**। रायगड । प्रतिनिधी ।**
विधानसभा निवडणुकीत विविध माध्यमांद्वारे प्रदर्शित किंवा प्रसारित करण्यात येणाऱ्या जाहिरातींचे पूर्वप्रम ाणीकरण जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून करून घेणे बंधनकारक आहे. विविध राजकीय पक्षांचे उमेदवार, प्रतिनिधी यांनी या माध्यम ांवर जाहिरात देण्यापूर्वी पूर्वप्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे टेलिकास्ट, ब्रॉडकास्ट करण्यापूर्वी, दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम वाहिन्या, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हाईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती, मतदानाच्या आणि त्याच्या एक दिवस आधी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती यांना समितीकडून पूर्वमान्यता घेणे बंधनकारक आहे.

पान १ वरून

## ‘जनहितासाठी प्रतिनिधीत्व करणार’

**चाक नेहमीच पुढे नेणारे आहे. प्रगतीचे, बदलाचे, विकासाचे हे प्रतिक आहे. तोच विचार घेत ग्रामीण भागातील मुलींना सायकली दिल्या आहेत. त्यामुळे सायकलवाली ताई म्हणून ओळख निर्माण झाली आहे. हेच विकासाचे चाक घेऊन पुढे जात आहे. अलिबाग विधानसभा मतदार संघातून जनताच मला मतपेटीतून कौल देईल, असा विजयाचा आशावाद, विश्वास शेकापच्या उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी व्यक्त केला आहे.**

## जिल्ह्यात आज सहा नामनिर्देशनपत्र दाखल

असून यामध्ये शेतकरी कामगार पक्षाच्या चित्रलेखा नृपाल पाटील, सुप्रिया जयंत पाटील आणि अपक्ष सुभाष जनार्दन पाटील यांचा समावेश आहे.१९१-पेण विधानसभा मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टीचे रविंद्र दगडू पाटील यांनी १ नामनिर्देशन पत्र सादर केले. १९०-उरण विधानसभा मतदार संघामध्ये अपक्ष उमेदवार आज कुंदन घरत यांनी १ नामनिर्देशन पत्र सादर केले. विधानसभा निवडणूक लाढविण्यासाठी उमेद-वारी अर्ज नेणाऱ्यांची गुरूवारपर्यंतची संख्या लक्ष वेधणारी आहे. यामध्ये १८८-पनवेल २९ अर्ज, १८९-कर्जत ५ अर्ज, १९०-उरण ३ अर्ज, १९२-अलिबाग ५ आणि १९४-महाड विधानसभेसाठी ५ अर्ज नेण्यात आले आहेत.

## पाथरशेतच्या मंदिरावरील कळस कोसळला

सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या पथकाने पाथरशेत गावात जाऊन मंदिराची पाहणी केली. परंतु पाथरशेत पंचक्रोशी यांनी त्याच संध्याकाळी ग्रामसभा घेतली व वीज पडून मंदिराचे नुकसान झाले असेल, असे ग्राह्य धरले आहे. यामध्ये मंदिराचे प्रचंड नुकसान झाले आहे. मंदिराच्या वर तांब्याचा कळस आहे. त्याचे चार-पाच तुकडे झाले आहेत. तर मंदिरातील पत्र्याच्या शेडचे नुकसान झाले असून मंदिरातील सर्व लाईट फिटिंग जळली आहे. लाईटचे बोर्ड ही तुटले आहेत. ट्यूबलाईट, फॅन, बाहेरचे हॉलिजन याचे नुकसान झाले आहे. ही नैसर्गिक आपत्ती असेल तर शासनाने मंदिराची पुन्हा एकदा बांधणी करून देण्याची ग्रामस्थांची मागणी आहे. वैयक्तिक प्रकार असेल तर अधिक तपास करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात असुन पुढील तपास कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

## स्नेहल जगताप सोमवारी अर्ज दाखल करणार

(दि.२४) घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये स्नेहल जगताप यांचा अर्ज दाखल आणि होणाऱ्या प्रवेशाबाबत माहिती देण्यात आली.यावेळी धनंजय देशमुख माजी नगराध्यक्ष संदीप जाधव माजी नगरसेवक सुदेश कळमकर, प्रमोद महाडिक आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी त्यांनी स्नेहल जगताप यांना अधिकृत तिकीट मिळालेले असून त्या २८ ऑक्टोबर रोजी अर्ज दाखल करणार असल्याचे सांगितले. तसेच त्यावेळी भव्य रॅली निघणार असून रॅलीचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे होणार आहे.

महाड विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना शिंदे गटाचा प्रचार होण्याआधीच तळागाळामध्ये, गावागावात, वाडी-वाडीवर आमच्या प्रचार झाला असल्याचे देखील स्पष्ट केले. जुन्या पदाधिकाऱ्यांना आणि नवीन पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन महाड तालुक्यामध्ये नक्कीच बदल घडवू, असा विश्वास देखील धनंजय देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

## पनवेल रेल्वेस्थानकाचा होणार पुनर्विकास

सध्या त्याचे काम जोरात सुरू आहे. मूळ निवड झालेल्या ७६ स्थानकांपैकी ७ स्थानकांच्या सॉफ्ट अपग्रेडेशनची कामे पूर्ण झाली आहेत. नुकत्याच समाविष्ट झालेल्या ३ स्थानकांसाठी जळगाव, अक्कलकोट आणि पनवेल प्राथमिक कामे हाती घेतली जात आहेत जी चालू वर्षात मंजूर झाली आहेत.मध्य रेल्वेमध्ये छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर आणि अजनी या ३ स्थानकांवर मुख्य अपग्रेडेशनचे काम सुरू आहे. त्यांची एकूण भौतिक प्रगती अनुक्रमे ५ टक्के, ३२ टक्के आणि ३२ टक्के आहे. मध्य रेल्वेने प्रमुख अपग्रेडेशन कामासाठी आणखी १६ स्थानके निवडली जाणार आहेत.

यामध्ये दादर, ठाणे, ठाकुर्ली, कल्याण, लोकमान्य टिळक टर्मिनस-एलटीटी, लोणावळा, भुसावळ, अकोला, अमरावती, खंडवा, नाशिक रोड, वर्धा, पुणे, मिरज, शिवाजी नगर आणि साई नगर शिर्डी या स्थानकांवर डीपीआर अंदाज प्रगतीपथावर आहेत.एबीएसएस धोरण रेल्वे मंत्रालयाने तयार केले होते, ज्याचे उद्दिष्ट रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करणे, दीर्घकालीन दृष्टीकोनातून सतत विकासाची कल्पना करणे हे आहे. ही कल्पना एका मास्टर प्लॅननुसार विविध गंभीर घटकांच्या अंमलबजावणीवर आधारित आहे. जी सतत वाढत्या गरजा आणि रेल्वे स्थानकांचे वर्धित संरक्षण पूर्ण करते. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत नियोजित सुविधांमध्ये हे समाविष्ट आहे. वर्धित कनेक्टिव्हिटी, एक सुधारित फूट ओव्हर ब्रिज, अतिरिक्त लिफ्ट आणि एस्केलेटर सुविधांनी पूरक, प्रवाशांची हालचाल आणि सुलभता सुलभ करेल. आधुनिक ट्रेन इंडिकेशन बोर्ड आणि प्रवासी-अनुकूल चिन्हे स्टेशन परिसरात अखंड मार्गदर्शन आणि माहिती सहज उपलब्ध होणार आहे.


## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री. विलास काशिनाथ ठोंबरे, यांनी जमीन मालक १.पांडुरंग दामू बोराडे, २. भास्कर दामू बोराडे, ३. यमुनाबाई रघुनाथ घोडविंदे, ४.कुसुम शिवाजी मोहिते, ५.काशीबाई राजाराम पिंगळे, ६. माणिक अशोक हरपुडे, ७. भागुबाई संभाजी बांगर, ८. लता रवींद्र भोईर, ९. वनिता कृष्णा बोराडे, १०. कल्याणी अनंता मोहिते, ११. कोमल रुपेश थोरवे, १२. चिंतामण कृष्णा बोराडे, १३. नाजुका मयूर भोईर, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**-: मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - एकसळ, ता. कर्जत, जि. रायगड, येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १२/५ | ०.४६.०० | ०.५४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८
कर्जत दि. २५/१०/२०२४

**निवडक**

### हरवलेल्या मुलाचा शोध

**पनवेल :** हितांश मेहेरे हा शहरातील जव्हेरी बाजारपेठेतून हरवला होता. आपला मुलगा त्या ठिकाणी नसल्याचे त्याच्या आईच्या लक्षात आले. त्याचा शोध घेतला असता तो मिळून आला नाही. यामुळे पनवेल शहर पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली. ज्या ठिकाणी मुलगा उभा होता तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासले. यावेळी कॅमेऱ्यात तो मुलगा आढळून आला. अधिक शोध घेत असताना हा मुलगा आदिल टॉवर परिसरात उभा असल्याचे दिसून आल्याने पोलिसांनी त्या ठिकाणी जाऊन मुलाला ताब्यात घेतले.

### लादी कामगाराचे गैरकृत्य

**पनवेल :** करंजाडे सेक्टर ४ येथे राहणाऱ्या विवाहित महिलेच्या घरातील गॅलेरीमध्ये लादी बसविण्यासाठी कामगार सत्येंद्र सिंग (२८) हा आला होता. दरम्यान, या घरातील महिला ही तब्येत बरी नसल्याने हॉलमध्ये असलेल्या कोचवर झोपली होती. यावेळी त्या कामगाराने तो घराबाहेर पडत असताना या महिलेच्या हाता पायावरुन तसेच अंगावरुन हात फिरवून त्यांच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे गैरकृत्य केले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### वृद्ध इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक ६४ वर्षीय वृद्ध कुठेतरी निघून गेल्याने ते हरविल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. नवीन पनवेल सेक्टर १९ येथे राहणारे मदन मनोरे त्यांचा रंग गोरा, उंची पाच फूट पाच इंच, बांधा मध्यम आहे. त्यांनी फुल पॅन्ट आणि शर्ट घातलेला आहे. त्यांना मराठी, इंग्रजी आणि हिंदी भाषा बोलता येते. यांच्याबाबत अधिक माहिती असल्यास पोलिस हवालदार धीरेंद्र पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

### जप्त वाहनांचा लिलाव

**पनवेल :** विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांचा जाहीर लिलाव तळोजा पोलीस ठाण्याच्या मार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये प्रामुख्याने बजाज कंपनीची पल्सर मोटार सायकल, अॅक्टीव्हा स्कुटी, अॅक्सेस १२५, रिटस् कार, हिरो होंडा, होंडा अॅक्टीव्हा या ५ वाहनांचा समावेश आहे. या जाहीर लिलावात इच्छुक असणाऱ्या इसमांनी तळोजा पोलीस ठाणे (०२२-२७४१२३३३), वपोनि अविनाश काळदाते (९८६७७९७१७२) पो.हवा. निवळे (९०८२१२५१४१) यांच्याशी संपर्क साधावा.

### नामनिर्देशनपत्र दाखल नाही

**कर्जत :** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन भरण्यास २२ ऑक्टोबर पासून सुरुवात झाली आहे. गुरूवारी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी कर्जत विधानसभा मतदारसंघात एकही नामनिर्देशन दाखल झाले नसल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी दिली आहे. कर्जत विधानसभा मतदार संघात गुरूवारपर्यंत एकूण १३ अर्ज घेऊन जाण्यात आले आहेत. मात्र, २४ ऑक्टोबरपर्यंत एकही नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले नाही.

# पावसाचा कांदा उत्पादकांना फटका



## अलिबागच्या पांढऱ्या सोन्याची लागवड लांबणीवर

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**
**परतीच्या पावसाचा फटका रायगड जिल्ह्यातील भात पिकाबरोबरच जानेवारीत तयार होणाऱ्या अलिबागमधील पांढऱ्या कांदा उत्पादनावरही बसला आहे. सतत पाऊस सुरु राहिल्याने यंदा जमीनीत ओलावा वाढला आहे. यामुळे यावर्षी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची लागवड एक महिना उशीरा होणार असल्याची माहिती कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी दिली आहे.**

औषधी गुणधर्म असलेला पांढरा कांदा म्हणून अलिबागच्या कांद्याला ओळखले जाते. अलिबाग तालुक्यात सुमारे तीनशेहून अधिक एकर कांद्याचे क्षेत्र आहे. एक हजारहून अधिक शेतकरी कांदा उत्पादक आहे. चविष्ट व रुचकर अशी अलिबागच्या पांढऱ्या कांद्याची ओळख आहे. कार्ले, खंडाळे, वाडगाव, सागाव, तळवली, नेहुली अशा अनेक भागात पांढऱ्या कांद्याची लागवड केली जाते. कांदा उत्पादनातून करोडो रुपयांची उलाढाल होते. दरवर्षी स्थानिकांसह पर्यटक अलिबागचा कांदा खरेदी करण्यासाठी येत असतात. अलिबागच्या या पांढऱ्या कांद्याला मुंबई, पुणेसह अनेक जिल्ह्यात तसेच देशात प्रचंड मागणी आहे.

यावर्षी जिल्ह्यात समाधानकारक पाऊस पडला आहे. भातशेतीला पोषक असे वातावरण मिळाले आहे. परंतु, परतीच्या पावसामुळे भातशेतीला मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. त्याची झळ अलिबागच्या कांद्याला पोहचली असल्याची चिंता कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. परतीच्या पावसामुळे जमीनीत ओलावा राहिला आहे. ओलाव्यामुळे कांद्याची रोपे तयार होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत. पावसामुळे कांद्याची लागवड यावर्षी एक महिना उशीरा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. डिसेंबरमध्ये ही लागवड होईल, असे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. कांदा उशीरा बाजारात दाखल झाल्यास त्याचा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

### महिलांना रोजगाराचे साधन

दिवाळीला पांढऱ्या कांद्याची रोपे तयार करून त्याची लागवड केली जाते. यानंतर जानेवारीमध्ये कांदा तयार होतो. दोन ते अडीच महिन्याच्या कालावधीत ही प्रक्रीया पुर्ण होते. कांदा तयार झाल्यावर कांदा शेतातून काढणे, तो सुकविणे, त्याच्या माळी तयार करणे, बाजारात विक्रीसाठी पाठविणे अशी अनेक प्रकारची कामे केली जातात. यातून स्थानिक महिलांनाही रोजगाराचे साधन खुले होत असून शेकडो हातांना काम मिळते.

### बाहेरील विक्रीवर अंकूश

अलिबागच्या कांद्याला भौगोलिक मानांकन प्राप्त झाले आहे. यामुळे अलिबागच्या कांद्याची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. त्याची प्रक्रीया सुरु झाली असून शेतकऱ्यांचे गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक शेतकऱ्यांना बारकोट मिळणार आहे. यामुळे अलिबागच्या नावाने बाजारात येणारा अन्य जिल्ह्यातील व भागातील कांदा विक्रीवर अंकुश राहणार आहे.

> “पांढऱ्या कांद्याची रोपे तयार केली आहेत. परंतु, परतीच्या पावसामुळे प्रचंड त्रास होत आहे. कांद्याची रोपे पावसात खराब होऊ नये यासाठी त्यावर प्लास्टीकचे आवरण टाकले जात आहे. ही रोपे कुजण्याची भितीदेखील आहे. यंदा पांढऱ्या कांद्याची लागवड एक महिना उशीरा होणार आहे. त्याचा उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे.”
>
> – सतिश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी

## श्रीवर्धनमध्ये महावितरण विरोधात संताप


**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी विभाग अंतर्गत असणारे अनेक गावे तासनतास अंधारात असतात. सद्या ऑक्टोंबर हिट असतानाच विजेचा खेळखंडोबा सुरू झाला आहे. मात्र, दिवस-रात्र होणारा त्रास गेल्या दोन अठवड्यापासुन सुरु असल्याने येथील नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

तालुक्यातील गावोगावी सुरळीत सेवा देण्यासाठी तयारीचा दावा करणाऱ्या वीज वितरण कंपनीचे पितळ नेहमी उघडे पडत आहे. श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी परिसरात अनेक भागांसह ग्रामीण भागातील २३ गावांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू आहे. कार्ले, दांडगुरी, नागलोली, वाळवटी, मेघरे या गावांच्या परिसरातील एकूण तेवीस गावांत




विजेचा खेळखंडोबा सुरु आहे. ही गावे आड मार्गावर असून तालुक्यातील दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो. या गावांना विद्युत रात्रंदिवस विजेची गरज असताना दिवसातून पाच मिनिटे लाईट असला तर काही वेळात बंद होतो. 'महावितरण'च्या वितरण व्यवस्थेतील काही त्रुटींप्रमाणेच या वेगवेगळ्या यंत्रणांच्या हलगर्जीपणाचा फटका मात्र नागरिकांना बसत आहे. ऐन गरजेच्या वेळी वीज जाण्याचे प्रकार का होतात, असा प्रश्न उपस्थित केला जातो. त्याला 'महावितरण'ची यंत्रणा काही प्रमाणात जबाबदार असल्याचा आरोप होत आहे.



● हिरव्यागार नारळ पोफळीच्या बनात लपलेल्या मुरूड शहरातील कौलारू घरांचे नयनरम्य दृश्य. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## ग्रामपंचायत प्रशासक ॲक्शनमोडमध्ये

**। नेरळ । वार्ताहर ।**

नेरळ ग्रामपंचायत सदस्यांच्या राजीनाम्यानंतर विभागीय आयुक्तांनी नेरळ ग्रामपंचायत विसर्जित केली होती. तर, या ग्रामपंचायतीचा कारभार सांभाळण्याची जबाबदारी प्रशासकावर आली आहे. अशातच डेंग्यूने थैमान घातलेल्या नेरळ शहरात सध्या ग्रामस्थांना स्वच्छता, आरोग्य सुविधा पुरवण्यावर प्रशासक सुजित धनगर यांनी भर दिला आहे. यासाठी सकाळी ६:०० वाजता नेरळमध्ये पोहचून कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेत त्यांना सूचना दिल्या आहेत.



नेरळ ग्रामपंचायत सदस्य व सरपंच यांच्यात मतभेद वाढून सरसकट सर्व सदस्यांनी राजीनामा दिला होता. यामुळे कोकण विभागीय आयुक्तांनी नेरळ ग्रामपंचायत विसर्जीत केली होती. यानंतर जिल्हा परिषदेमध्ये लघु पाटबंधारे विभागाचे उपअभियंता असलेले सुजित धनगर यांना नेरळ ग्रामपंचायतीच्या प्रशासकाची जबाबदारी देण्यात आली आहे. धनगर यांनी बुधवारी (दि.२३) सकाळी ६ वाजता नेरळमधील स्वच्छता करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भेट घेतली.

शहरात सध्या डेंग्यू सदृश्य परिस्थिती असल्याने स्वच्छतेत कुचराई नको, अशा सूचना त्यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. यावेळी नेरळ शहरातील सर्व प्रभाग सकाळी फिरून तेथील कर्मचारी हे आपले काम चोख पार पडत आहेत याची खात्री करून घेतली. यासह सकाळी आलेल्या काही नागरिकांकडून तेथील समस्या देखील जाणून घेतल्या. तर, सकाळी नेरळ शहरात पाणी सोडण्यास सुरुवात केली जाते.

## हॉस्पिटलमधील गरजूंना अन्नदान

**। वावोशी । वार्ताहर ।**

राष्ट्रीय सामाजिक न्याय आणि मानवाधिकार आयोग ही एक अखिल भारतीय सामाजिक संस्था असून, त्यांचे कार्यकर्ते आणि अधिकारी देशभरात लोकांच्या मानवी हक्कांसाठी कार्यरत आहेत. नुकतेच आयोगाच्या धारावी विभागाच्यावतीने सायन हॉस्पिटलमध्ये २०० गरजू व्यक्तींना अन्नदान करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमामध्ये डॉ. इंद्रजीत धर्मराज गौंड, देवेन्द्र होगानी, ॲड. अपर्णा गडकरी नक्का, सुखदेव बोदी आणि अनेक कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होतो.

## कलाकाराचा कलाकाराकडून सन्मान

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

कलाकाराची काय सुख दुःख असतात ते एका कलाकारालाच माहीत असते. यामुळे एका नव्या दमाच्या कलाकाराकडून सच्चा कलाकाराचा सन्मान होणे ही नाट्यकलेच्या दृष्टीने मोठी गोष्ट आहे. असे गौरउद्गार नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी काढले.



अष्टगंध कला मंचाचे रंगकर्मी कृष्णकांत म्हात्रे व अशोक म्हात्रे या कलाकारांचा दिवाळी सणाच्या निमित्ताने त्यांच्या नाट्य गुणांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने मंगळवारी (दि.२२) गोवठणे येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे व कलाकार जयकिसन मोकल यांच्या हस्ते कृष्णकांत म्हात्रे व अशोक म्हात्रे यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या सन्मान सोहळ्याला नाटककार हसूराम पाटील, नाटककार धनेश्वर म्हात्रे, अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, रंगकर्मी जयकिसन मोकल, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, सत्कारमूर्ती कृष्णकांत म्हात्रे, कांचन म्हात्रे, सिमरन म्हात्रे, साई म्हात्रे तसेच अन्य जण उपस्थित होते.



## दारूची वाहतूक करणारे जाळ्यात

**। रसायनी । वार्ताहर ।**

अगामी निवडणुकीच्या अनुषंगाने अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना दिले असून याबाबत ठिकठिकाणी असणाऱ्या अवैध धंद्यांवर निर्बंध लावले आहेत. अशातच मोहोपाडा-आपटा रोडवरून अवैधरित्या देशी-विदेशी दारूची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती गून्हे शाखेला मिळाली होती. दरम्यान, दुपारच्या सुमारास दारू घेऊन जाणाऱ्या रिक्षावर पाळत ठेवून असताना दोन संशयित रिक्षा (एमएच-४६-एझेड-२४४६ व (एमएच-४६-एझेड-४८२५) या मोहोपाडाकडून येत असताना थांबविल्या. यामध्ये सिटवरील बॉक्समध्ये ३ लाख ६०८ रूपये किंम तीची दारू आढळून आली. याबाबत रिक्षाचालक सुरेश गायकर (६६) व महेंद्र जाधव (४५) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अडगळीच्या सामानातून मोठा फायदा

## भंगार वाल्यांची दिवाळी जोरात

**। पनवेल । वार्ताहर ।**
**देशात दिवाळी हा सण जोरात साजरा होत असतो. या करता न चुकता घराची साफसफाई आणि रंगरंगोटी करण्यात येत असते. अशा वेळी वापरात नसलेले टाकऊ सामान भंगार विक्रेत्याला विकून काही पैसे खिशात टाकून घेण्याला पसंती दिली जाते. याचा फायदा भंगार सामान खरेदी करणाऱ्या विक्रेत्यांना होत असून या विक्रेत्यांची देखील दिवाळी जोरात साजरी होत आहे.**

दिवाळी सणाला अनेकजण नवीन साहित्य खरेदी करण्याला पसंती देत असतात. यामध्ये सोने, नवीन वाहन, इलेक्ट्रॉनिक्स सामान, फर्निचर, भांडी, विविध प्रकारच्या शोभवंत वस्तू यांचा समावेश असतो. कालांतराने यापैकी बरेच सामान वापराता येत नसल्याने आडगळीत टाकले जाते. इतर वेळी अडगळीत टाकलेल्या या साहित्या कडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, दिवाळीत करण्यात येणाऱ्या साफसफाई वेळी हे



साहित्य बाहेर काढले जाते. यातील टाकाऊ सामान भंगार खरेदी करणाऱ्या विक्रेत्यांना विकण्यासाठी नेले जाते. भंगार खरेदी करणारे विक्रेते देखील भंगारात आलेल्या वस्तूंच्या किंमतीनुसार दर देऊन आलेल्या ग्रहकाला खुश करत असतात. यामुळे ग्राहक आणि विक्रेता या दोघांची दिवाळी जोरात साजरी होते.

### विक्रेत्यांना फायदा

भंगारात खरेदी केलेले साहित्य विक्रेते पुढे मोठ्या व्यापाऱ्याकडे विक्रीसाठी पाठवत असतात. यातून भंगार खरेदी करणाऱ्या छोट्या विक्रेत्यांना देखील मोठा आर्थिक फायदा होत असतो. दिवाळीत हे प्रमाण जास्त असल्याची माहिती एका भंगार विक्रेत्याने सांगितली आहे.

> “अनेकजण भंगार म्हणून सगळ्याच प्रकारचे टाकाऊ साहित्य घेऊन येतात. आम्ही देखील ग्राहकाला नाराज न करता भंगारात विकले जाऊ शकत नसलेले थोडेफार सामान विकत घेत असतो.”
>
> – विनोद सोळंकी. भंगार विक्रेता.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# मुंग्या उलट्या फिरतील

सध्या आपल्याकडे घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याची शर्यत लागलेली आहे. म्हणजे जग आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि चंद्र-मंगळावर वस्ती करण्याच्या गोष्टी करीत असताना आपल्याकडे गायीच्या शेणाचे आणि गोमूत्राचे तथाकथित धार्मिक महत्व सांगितले जात आहे. जातिभेदामध्ये गैर काही नाही असे म्हटले जात आहे. आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी असाच एक मुद्दा काढला आहे. आंध्रासारख्या राज्यांमध्ये लोकसंख्या कमी होत असून लोकांनी दोनहून अधिक मुले जन्माला घालायला हवीत असे आवाहन त्यांनी केले आहे. इतकेच नव्हे तर, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दोनहून अधिक मुले असलेल्यांनाच लढवता येतील असा कायदा करण्याचे संकेतही त्यांनी दिले. सध्या बहुतेक सर्व राज्यांमध्ये दोनहून अधिक मुले असलेल्यांना पंचायत वा जिल्हा परिषद निवडणुका लढवता येत नाहीत. पण आंध्र प्रदेशाने यंदाच्या ऑगस्टमध्ये हा नियम रद्द केला. नायडू यांची ही भूमिका नंतर तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालीन यांनीही उचलून धरली. स्टालीन यांनी तर लोकांनी आरोग्याचे सोळा मंत्र जपणे सोडून सोळा मुले जन्माला घालायला हवीत असे गमतीने सांगितले. नायडू व स्टालीन हे दोघेही पुराणमतवादी नाहीत. नायडू एकेकाळी स्वतःला राज्याचे सीईओ म्हणवून घेत. त्यांच्या काळातच हैदराबाद हे आयटीचे मोठे केंद्र झाले. गुगल, एमेझॉन, फेसबुक अशासारख्या कंपन्यांची अमेरिकेबाहेरची मोठी कार्यालये इथे थाटली गेली. स्टालीन हे पेरियार यांच्या द्रवीड चळवळीचा वारसा सांगतात. पेरियार यांनी कुटुंबनियोजनाचा प्रचार करण्याची गरज प्रतिपादन केली होती. त्यामुळे नायडू व स्टालीन यांचे म्हणणे हे विचित्र असले तरी समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. भारत नुकताच जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश झाला. पण देशातील लोकसंख्या सर्वत्र सारख्याच रीतीने वाढत नाही. दक्षिण भारतातील राज्यांनी कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम चांगल्या रीतीने राबवला असून तेथे प्रतिकुटुंब दोन नव्हे तर एकच मूल जन्माला घालण्याचे प्रमाण वाढते आहे.

## लोकसंख्येचा लाभांश

उत्तरेतील बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान वगैरे हिंदी राज्यांमध्ये मात्र अजूनही वाईट स्थिती आहे. आता पूर्वीप्रमाणे पाच-दहा मुले होऊ दिली जात नसली तरी हम दो हमारे दो हा नारा पूर्णपणे अमलात आलेला नाही. सध्या आपल्याकडे डेमॉग्रॅफिक डिव्हिडंड किंवा लोकसंख्येचा लाभांश ही कल्पना फार लोकप्रिय आहे. नरेंद्र मोदीदेखील बऱ्याचदा तिच्याविषयी बोलतात. लोकसंख्येतील तरुणांचे प्रमाण अधिक असणे असा त्याचा अर्थ. काम करू शकणाऱ्यांची व त्यातही अत्यंत तरुण असलेल्यांची संख्या प्रौढ व वृध्दांपेक्षा अधिक असण्याचे अनेक फायदे असतात. एक म्हणजे अर्थव्यवस्थेतील उत्पादकता वाढते. दुसरे म्हणजे वृध्दांसाठी द्याव्या लागणाऱ्या पेन्शन, आरोग्य सेवा यांचा खर्च तुलनेने कमी राहतो. सध्या भारतात चाळीस टक्क्यांहून अधिक लोक हे वयाने २५पेक्षा कमी आहेत. त्यामुळे आपल्या लोकसंख्येचे सरासरी वय २८ आहे. अमेरिकेत ते ३८ तर चीनमध्ये ३९ आहे. अनेक युरोपीय देशांमध्ये किंवा जपानमध्ये ते चाळीस वा पन्नासच्या पुढे आहे. यामुळे तेथे नवीन कल्पना मांडू शकणारे, उत्साहाने व अधिक काळ काम करू शकणारे अशा तरुणांची कमी आहे. उलट वृध्दांची संख्या अधिक असल्याने त्यांच्यासाठीच्या तरतुदी करण्यात सरकारचा बराच महसूल खर्ची पडतो. आपल्याकडे तरुणांची संख्या सध्या जास्त दिसत असली तरी ती पुढील दहा वर्षात झपाट्याने कमी होणार आहे. कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम चांगल्या रीतीने राबवला जात असल्याने नवीन जन्माला येणाऱ्यांचे प्रमाण कमी होत जाणार आहे. दक्षिणेच्या राज्यात किंवा अगदी महाराष्ट्रातही हे दिसू लागले आहे. याचे परिणाम म्हणजे आंध्राच्या अनेक खेड्यांमध्ये केवळ वृध्द माणसेच मागे राहिलेली दिसतात. आपल्याकडे कोकण, मराठवाडा, विदर्भातही हीच स्थिती आहे. चंद्राबाबू व स्टालीन यांनी असे म्हटले आहे की, आज दक्षिणेत ही स्थिती असली तरी आणखी काही वर्षांनी उत्तरेतही हेच चित्र दिसणार आहे.

## रोगापेक्षा औषध जालीम

वरवर पाहता नायडू यांचे म्हणणे खरे वाटते. मात्र ते जे गंभीर भाकित वर्तवता आहेत ते पंचवीस वर्षांनंतरचे आहे. काही गावांमध्ये किंवा राज्यांमध्ये लोकसंख्या आटोक्यात आली याचा अर्थ सर्व देशातला प्रश्न सुटला असा होत नाही. शिवाय, खेड्यांमधून माणसे कमी झाली कारण तेथे विकास होत नाही. ही सर्व माणसे शहरांमध्ये येतात व किड्यामुंग्यांसारखी राहतात. दिल्ली, मुंबई यांच्यापाठोपाठ पुणे, नागपूर, कोल्हापूर या शहरांमध्ये याचे परिणाम दिसू लागले आहेत. प्रदीर्घ प्रयत्नानंतर आता कोठे आपल्या देशाची लोकसंख्या थोडीफार कमी होऊ लागली आहे. त्यावेळी अधिक मुले जन्माला घाला असे प्रगत राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी म्हणणे हे धोकादायक आहे. आपल्याकडे आजही कमी शिक्षित आणि धर्माचा व रुढींचा पगडा असलेल्यांची संख्या प्रचंड आहे. त्यांना नायडू यांच्यासारख्यांची वक्तव्ये ही योग्य वाटू शकतात. त्यातून कुटुंबनियोजनाचे काम थंडावू शकते. भारतासाठी ते धोकादायक ठरेल. उत्तरेकडील राज्यांमध्ये लोकसंख्या अधिक असल्याने मतदारसंघांच्या पुनर्रचनेत त्यांच्या वाट्याला लोकसभेच्या अधिक जागा जाणार आहेत. त्यामुळे देशातील चार किंवा पाच राज्यांमध्ये लोकसभेच्या साठ टक्के जागा असतील असे म्हणतात. तसे झाले तर येथील राजकारणावर या राज्यांची पकड मजबूत होऊ शकेल. मात्र या धोक्यावर मार्ग काढण्यासाठी उपाय शोधता येऊ शकतात. दक्षिणेकडील राज्यांना राखीव जागा ठेवणे किंवा त्यांना अधिक स्वायत्तता देणे अशा पर्यायांचा विचार होऊ शकतो. निधीवाटपामध्येही लोकसंख्या काबूत ठेवणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून अधिक सरकारी निधी देण्याचे आपला वित्त आयोग ठरवू शकतो. थोडक्यात या त्रुटींवर मार्ग काढता येऊ शकतो. मात्र त्यापायी परत आपल्या राज्यांची लोकसंख्या वाढवण्यास उत्तेजन देणे हे धोकादायक आहे. रोगापेक्षा औषध जालीम असा हा प्रकार होईल. भारताची आजची प्रगती देखील मुंगीच्याच गतीने चालू आहे. पुन्हा लोकसंख्या वाढू लागली तर या मुंग्याही उलट्या फिरतील.

विचार

# नंदनवनातील सरकारपुढील काटे

***जम्मू-काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला यांचे सरकार सत्तेवर आले. सहा वर्षांनंतर लोकनियुक्त सरकारच्या हाती कारभार आला. मात्र काँग्रेस आणि 'नॅशनल कॉन्फरन्स' यांची आघाडी असूनही ओमर आणि राहुल यांची एकही एकत्रित सभा झाली नाही. दोघांमध्ये काहीसा दुरावा दिसला. काँग्रेसने सत्तेत सहभागी न होता सरकारला बाहेरून पाठिंबा दिला. परिणामी, या सरकारची वाटचाल नीट होईल का, याची चर्चा धुरिणांमध्ये आहे.***

**अजय तिवारी**

गेल्या दहा वर्षांनंतर जम्मू-काश्मीर या केंद्रशासित राज्यात ओमर अब्दुल्ला यांचे पहिले सरकार सत्तेवर आले. सहा वर्षांनंतर लोकनियुक्त सरकारच्या हाती कारभार आला. काश्मीर आणि अब्दुल्ला कुटुंबीय यांचे नाते अतूट आहे. अब्दुल्ला कुटुंबातील चौथी पिढी सत्तेत आली आहे. जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत भाजपचे गणित चुकले आणि मतविभागणीच्या खेळीला खोऱ्यातून साथ मिळाली नाही. पंडित नेहरूंपासून अब्दुल्ला कुटुंबाचे गांधी घराण्याशी चांगले संबंध आहेत; परंतु या वेळी काँग्रेस आणि 'नॅशनल कॉन्फरन्स' यांची आघाडी असूनही ओमर आणि राहुल यांची एकही एकत्रित सभा झाली नाही. राहुल आणि ओमर यांच्यात काहीसा दुरावा दिसला. जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर राहुल यांनी फारूक अब्दुल्ला यांचे अभिनंदन केले; परंतु ओमर यांचे नाही. त्यांच्या शपथविधीला राहुल आणि प्रियांका हे बहीण-भाऊ उपस्थित राहिले; परंतु काँग्रेस सत्तेत सहभागी झाली नाही. बाहेरून सरकारला पाठिंबा दिला. काँग्रेसने निवडणुकीसाठी जास्त जागा पदरात पाडून घेतल्या; परंतु त्या निवडून आणण्यासाठी जम्मू भागात भाजपशी ज्या निकराने लढा देणे अपेक्षित होते, तसा दिला नाही. ओमर यांच्या या बाबतच्या सूचनेकडे दुर्लक्ष केले. असे असले, तरी खोऱ्यात जनतेने ओमर यांच्यावर विश्वास टाकला. ते स्वतः दोन ठिकाणांहून निवडून आले. आता एका जागेचा राजीनामा देऊन तिथूनही ते 'नॅशनल कॉन्फरन्स'च्या उमेदवाराला निवडून आणतील. मात्र या सरकारची वाटचाल नीट होईल का, याची चर्चा धुरिणांमध्ये आहे.

सहा वर्षे काश्मीरची जनता प्रशासकीय राजवटीत होती. तिच्या आशा-आकांक्षा पूर्ण होत नव्हत्या. आपला लोकप्रतिनिधी सरकारमध्ये नसल्याने एकतर्फी सुरू असलेल्या विकासाला काहीच अर्थ नव्हता; शिवाय केंद्र सरकार रंगवत असलेले काश्मीरच्या विकासाचे चित्र आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थिती यात जमीन-अस्मानाचे अंतर होते. लादलेला विकास जनतेला कधीच मान्य नसतो. गेल्या सहा वर्षांमध्ये काश्मीरमधील दहशतवाद्यांना बऱ्यापैकी अटकाव केला गेला असला, तरी दहशतवाद थांबलेला नाही, ही वस्तुस्थिती उरतेच. गुंतवणुकीचे, विकासाचे आकडेही भ्रामक होते. त्यातच आता ओमर यांनी शपथ घेताना त्यांचे पंख अगोदरच छाटण्यात आले आहेत. उपराज्यपालांना जास्त अधिकार आहेत. त्यामुळे तर शपथग्रहण करताच ओमर यांच्या सरकारने जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याचा ठराव मंजूर करून केंद्र सरकारला पाठवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याचे त्यांनी जाहीर केले. एकीकडे भाजपने दिलेले पूर्ण राज्याचे आश्वासन पूर्ण केले नाही, म्हणून लडाखमधील सामाजिक आणि पर्यावरण कार्यकर्ते सोनू वांगचूक यांनी अगोदर लडाखमध्ये आणि नंतर दिल्लीमध्ये आंदोलन केले. भाजपने जम्मू-काश्मीरलाही पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिले होते. आता केंद्राच्या हाती असलेल्या सत्तेच्या काही दोऱ्या भाजप सहजासहजी सोडेल का, हा खरा प्रश्न आहे.

मित्रपक्ष म्हणून एकत्र निवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसच्या काही अपेक्षा पूर्ण झाल्या नसल्याने कदाचित सत्तेत सहभाग घेतला नसावा. अवघ्या सहा जागा निवडून आणून उपमुख्यमंत्रिपद आणि काही मलईदार खात्याची अपेक्षा केल्यानंतर ओमर यांनी नकार दिल्यानेच कदाचित राहुल-ओमर दरी रुंदावली असावी. पूर्ण राज्याचा दर्जा मिळेपर्यंत सरकारमध्ये सहभागी होणार नाही, असा पवित्रा काँग्रेसने घेतला आहे. पाच अपक्ष आणि 'आप'च्या एका आमदाराने पाठिंबा दिल्याने 'नॅशनल कॉन्फरन्स'ला तशीही काँग्रेसची गरज राहिलेली नाही. ओमर यापूर्वी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री होते; पण त्या वेळी ते मोठे राज्य होते. त्यात लडाखही होता; पण आता जम्मू-काश्मीर आणि लडाख हे वेगळे केंद्रशासित प्रदेश झाले आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा आहे आणि लडाखचे लोक सध्या दिल्लीत सहाव्या शेड्यूलबाबत आंदोलन करत आहेत.

दिल्लीतील 'आप' सरकारप्रमाणे ओमर यांना अधिकारांसाठी संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल. आतापर्यंत केलेली सर्व विधाने पाहता त्यांनी परिपक्वता दाखवली आहे, असे म्हणता येईल; पण सरकार चालवताना जनतेमध्ये जातील, तेव्हा त्यांना जनतेच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. अशा परिस्थितीत उपराज्यपालांवर त्यांचा दबाव येईल. उपराज्यपाल केंद्र सरकारच्या हातचे बाहुले असल्याने संघर्षाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

काश्मीरला विकासाच्या वाटेवर न्यायचे असेल, तर उपराज्यपालांनी आता पूर्वीच्या अधिकारांना मुरड घालून लोकनियुक्त सरकारला काम करू देण्याची भूमिका घ्यावी लागेल. अब्दुल्ला यांनी मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. याला उत्तर देताना ओमर यांनी त्यांचे आभार व्यक्त करत जम्मू-काश्मीरसाठी त्यांच्यासोबत काम करणार असल्याचे सांगितले. ओमर हे नवीन जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेत होते, त्याच दिवशी भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर पाकिस्तानच्या जखमेवर मीठ चोळण्यासाठी त्या देशात उपस्थित होते. शांघाय सहकार्य परिषदेमध्ये त्यांनी कोणत्याही राष्ट्राचे नाव न घेता दहशतवादाविरोधात आवाज उठवला आणि नातेसंबंधांमध्ये विश्वासाची गरज असल्याचे सांगितले. ओमर यांचा शपथविधी होत असताना त्यांची पाकिस्तानमध्ये उपस्थिती असणे, हा एक प्रकारे भारताचा मुत्सद्दी विजय म्हणता येईल. सुषमा स्वराज यांच्यानंतर पाकिस्तानामध्ये जाणारे ते दुसरे परराष्ट्रमंत्री ठरले आहेत. त्यामुळे इतक्या वर्षांनंतर त्यांना या दिवशी पाठवण्यामागे काही सुनियोजित मुत्सद्देगिरी होती का हा निव्वळ योगायोग होता, हे तपासावे लागेल.

ओमर यांनी अनुभवी खेळाडूप्रमाणे आपला संघ बांधला आहे. त्यामध्ये सकिना यट्टू या एका महिला मंत्र्यालाही ठेवण्यात आले आहे. छंबमधून विजयी झालेले काँग्रेसचे बंडखोर उमेदवार सतीश शर्मा यांनाही त्यांनी निवडले आहे. शर्मा यांनी भाजप उमेदवाराचा सुमारे सात हजार मतांनी पराभव केला. काँग्रेसच्या तिकिटावर येथून निवडणूक लढवणारे ताराचंद हे माजी उपमुख्यमंत्री होते आणि त्यांनी या जागेवरून तीनदा विजय मिळवला होता; मात्र शर्मा यांनी त्यांना तिसऱ्या स्थानावर ढकलले. शर्मा हेदेखील राजकीय कुटुंबातून आले असून त्यांचे वडील मदनलाल शर्मा पूंछमधून दोनदा खासदार राहिले आहेत. ओमर यांनी या एका बाणाने अनेकांवर निशाणा साधला आहे. ओमर यांच्यासह सहा मंत्री मंत्रिमंडळाचा भाग असून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र रैना यांचा पराभव करणाऱ्या सुरेंद्र चौधरी यांना विजयाची ट्रॉफी म्हणून उपमुख्यमंत्रिपद देण्यात आले आहे. यापूर्वीच्या सरकारांमध्ये जम्मू प्रदेशातून उपमुख्यमंत्री देण्यात आला होता. त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या दोन प्रदेशांमध्ये संतुलन निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. चौधरी हे डोंगरी भागातले. ओमर यांनी पीर पांजाळ क्षेत्राला मंत्रिमंडळात जास्त प्रतिनिधित्व देऊन त्या भागात स्वतःचा विस्तार करण्याच्या विचाराला चालना दिली आहे. ओमरच्या सरकारमधून काँग्रेसने भाग न घेण्याचे कारण असे असू शकते की काँग्रेसला आपल्या विजयी आमदारांमधील युद्ध टाळायचे आहे. सध्या काँग्रेस जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करण्याशी जोडत आहे. त्यांनी चार मंत्रिपदे रिक्त ठेवली आहेत. भविष्यात ते तत्कालीन राजकारणानुसार उर्वरित पदे भरण्याची शक्यता आहे.

निवडणुकीदरम्यान, 'नॅशनल कॉन्फरन्स'ने जनतेला अनेक आश्वासने दिली होती. त्यापैकी कलम ३७० आणि ३५ अ मागे घेण्यासह १९५३ पूर्वीची परिस्थिती परत आणण्याचेही आश्वासन होते; पण ही सर्व आश्वासने जम्मू-काश्मीरला लवकरात लवकर राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीवर उतरली आहेत. हीदेखील एक सकारात्मक बाजू आहे. सध्याच्या काळात ओमर यांना थोडा वेळ द्यावा आणि उपराज्यपालांनी आता थोडी विश्रांती घ्यावी. जम्मू हा काश्मीरच्या सीमेला लागून असलेला संवेदनशील भाग आहे. केंद्र आणि जम्मू आणि काश्मीर केंद्रशासित प्रदेश सरकारला त्यांच्या राजकीय हितसंबंधांवर उठून केंद्रशासित प्रदेशातील लोकांच्या कल्याणासाठी एकत्र काम करावे लागेल, जेणेकरून या सीमावर्ती भागात सीमापार षडयंत्र रचणाऱ्यांचा पूर्णपणे नायनाट करता येईल. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागणार आहे.

लोकसभा आणि राज्यसभेतही ते मंजूर करावे लागेल आणि राष्ट्रपतींकडून अंतिम मंजुरी घ्यावी लागेल. त्यानंतरच अधिकृत अधिसूचना जारी होऊन जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा मिळेल. ओमर यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. परिस्थिती पाहता ओमर यांचा मार्ग सोपा नाही हे स्पष्ट होते. जम्मू-काश्मीरमध्ये टप्प्याटप्प्याने सर्व काही लागू केले जाईल, असे मोदी सरकारने आधीच सांगितले आहे. केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरमध्ये सीमांकन, राज्यांमध्ये निवडणुका आणि त्याला पूर्ण राज्याचा दर्जा देणे ही तीन उद्दिष्टे समोर ठेवली होती. अर्थात ओमर यांच्या 'नॅशनल कॉन्फरन्स'ने निवडणुकीपूर्वी जनतेला दिलेली आश्वासने पाहता हा मार्ग अजिबात सोपा नसेल, असे स्पष्ट दिसते.

आजकाल

# चंद्रचूड खोटं बोलत आहेत ! - न्या. मार्केंडेय काटजू

**किशोर मांदळे**



पत्रकार नीलू व्यास यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना न्या. काटजू म्हणाले -

न्या. चंद्रचूड यांनी अयोध्या प्रकरणी देवाला कौल लावला वगैरे सगळं बकवास आहे. वस्तुस्थिती एवढीच आहे की हे चंद्रचूड अत्यंत करियरिस्ट माणूस असल्याने सरकारला खूष ठेवण्यासाठी त्या ४ न्यायमूर्तींसोबत यांनी देखील अयोध्या प्रकरणी झालेल्या 'बेकायदेशीर निर्णयात' होकार भरला.

अयोध्येचा निर्णय आला तेव्हा न्या. रंजन गोगोई हे सरन्यायाधीश होते. चंद्रचूड पांच न्यायाधीशांपैकी एक होते. त्यामुळे या निर्णयात त्यांचा फक्त सहभाग होता.

अयोध्या प्रकरणी निकालपत्र व दिलेला निर्णय यातच मोठी विसंगती आहे. एका बाजूला निकालपत्र म्हणत आहे - १) तिथे मंदिर असल्याचे पुरातत्वशास्त्रीय पुरावे नाहीत २) १९४९ पर्यंत तिथे मुस्लीम नमाज पढत होते ३) १९४९ला तिथे रामाची मूर्ती ठेवण्यात आली व नमाज बंद झाला ४) १९४७ पूर्वी जी स्थिती होती त्याच स्थितीला पुढे चालवावे या सूत्रानुसार ताबा मुस्लिम समूहाकडे द्यायला हवा होता ५) ताबा दिला हिंदूंना !

त्यामुळे चंद्रचूड यांनी त्यावेळी उर्वरित न्यायाधीशांचा होकारात होकार मिळवला तो आपले पुढचे करिअर लक्षात ठेवून. ही देवाला कौल लावण्याची स्टोरी निव्वळ बकवास आहे. खोटी आहे.

चंद्रचूड पितापुत्र आपल्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत गणिती सावधानता बाळगणारे राहिले आहेत.

(काटजू यांनी यावेळी, धनंजय याचे वडील न्या. यशवंत चंद्रचूड यांचाही अशाच प्रकारचा संधीसाधूपणा सोदाहरण स्पष्ट केला आहे)

न्या. धनंजय चंद्रचूड यांचे सततचे प्रकाशझोतात मिरविणे ही बाब न्यायाधीशांना शोभणारी नाही. न्यायाधीशांनी कोर्टात व समाजात दोन्हीकडे मितभाषी असावे, अशी आम्हाला आमच्या ज्येष्ठांची शिकवण आहे.

न्या. धनंजय चंद्रचूड यांना न्यायाधीश असणे म्हणजे काय, तेच कळलेले नाही.

न्याय ही संकल्पना केवळ न्यायालयांच्या चार भिंतींच्या मर्यादेत नाही. ती खरेतर न्यायालयाच्या बाहेर समाजात अस्तित्वात राहावी यासाठी न्यायालये आहेत. न्यायिक समता म्हणजे न्याय. मग ते शिक्षण असो, आरोग्य सुविधा असो, विविध प्रकारच्या असमानता दूर करणे असो, लोकांना सुरक्षित जगता येण्याची बाब असो, सर्वत्र न्यायाचे रक्षण करणे हे न्यायपालिकेचे काम आहे.

शेवटी पत्रकार नीलू व्यास यांनी काटजू यांना विचारले की, आपण न्या. धनंजय चंद्रचूड यांना काय सल्ला द्याल ?

त्यावर काटजू म्हणाले. सल्ला त्यांनाच द्यावा, ज्यांना त्याचे मोल समजते. मुद्दा स्पष्ट करण्यासाठी त्यांनी एक गोष्ट सांगितली.

एकदा खूप पाऊस पडत होता. पावसात माकड भिजत होते. त्याचवेळी झाडावर एक पक्षी आपल्या घरट्यात सुरक्षित बसला होता. तो पक्षी माकडाला म्हणाला - तू सुद्धा असं एखादं घरटं का बांधत नाहीस ? पाऊस आला तर तुला भिजावे लागणार नाही. या अनाहूतपणे दिलेल्या सल्ल्याचा माकडाला राग आला व त्याने त्या पक्षाचे घरटे ओरबाडून फेकून दिले ! **(साभार)**

लोकसंसद

## उत्तरेकडे वायू प्रदूषणाचा कहर, तर पूर्वेकडे चक्रीवादळ!

इकडे महाराष्ट्रात ऑक्टोबर संपत आला तरी परतीचा पाऊस जाण्याचे नाव काढत नाही तर तिकडे दिल्लीसह उत्तर भारतात गेल्या काही वर्षांपासून गंभीर होत असलेल्या वायू प्रदूषणाने आता उच्चांक गाठला आहे. धूर आणि धूळ यांचे मिश्रण असलेल्या विषारी धुरक्यामुळे (स्मॉग) हवेचा गुणवत्ता निर्देशांक (एअर क्वालिटी इंडेक्स) गेले दोन दिवस ४०० च्या आसपास पोहोचल्यामुळे लोकांना श्वास घेणे कठीण झाले. तसेच अनेकांना डोळे जळजळण्याचा त्रास होऊ लागला. खबरदारीचा उपाय म्हणून प्राथमिक शाळांना सुट्टी देण्यात आली. उत्तर भारतात एकीकडे वायू प्रदूषणाने असा भयानक कहर केलेला असतानाच दुसरीकडे भारताच्या पूर्वेकडील बंगालच्या उपसागरात तयार झालेले 'दाना' हे तीव्र चक्रीवादळ प. बंगाल, ओडिशा राज्याच्या किनारपट्टी भागावर ताशी १०० ते १२० किलोमीटर वेगाने वाहण्याऱ्या वाऱ्यांसह अतिवृष्टी घेऊन धडकणार आहे. चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही राज्यांमध्ये अतिदक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. भारत हा विषुववृत्ताजवळ असणारा ऊष्ण कटिबंधातला देश असल्यामुळे येथे वेगवेगळ्या प्रदेशातले हवामान एकाच वेळी वेगवेगळे असते हे जरी मान्य केले तरी अनिर्बंध विकासामुळे येथील निसर्गाचा आणि पर्यावरणाचा बिघडलेला समतोल आणि त्याचे असे घातक दुष्परिणाम नजरेआड करता येणार नाहीत.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२५ ऑक्टोबर**

**१८९०:-** वैद्यकीय ग्रंथाचे लेखक गोपाळ शिवराम लागवणकर यांचे निधन. पेशाने डॉक्टर असणाऱ्या लागवणकरांनी 'शस्त्रवैद्यक : सर्जरी' आणि 'न्यायवैद्यक : मेडिकल ज्युरिसप्रूडन्स' हे दोन ग्रंथ इंग्रजी ग्रंथांच्या आधारे मराठीतून लिहिली. मराठी भाषेत वैद्यक ग्रंथाची भरावी हा त्यांचा हेतू ह्याखेरीज ह्यांनी 'दंभहारक' ह्या मासिकातून 'शरीरसंपत्ती' या विषयावर निबंध लिहिले. **१९१२:-** लेखिका, कवी, आत्मकथनकार अरुणा पवार/चवरे यांचा जन्म. 'नाद', 'नरंग', 'अर्थ', 'झुंज' हे काव्यसंग्रह आणि 'अनामिका' हे आत्मकथन त्यांचे प्रसिध्द झाले आहे. **१९१३:-** लेखक, भाषांतरकार अप्पाशास्त्री सदाशिवशास्त्री राशिवडेकर यांचे निधन. 'संस्कृतचंद्रिका' हे मासिक व 'सुकृतवादिनी' हे साप्ताहिक काही काळ चालवले. तसेच 'श्रीविष्णुपुराण व श्रीमन्ममहाभारत' ह्या ग्रंथांचे मराठी सुरेख भाषांतर त्यांच्या नावावर आढळते. **१९१७:-** भगवंत पाळेकर यांचा 'जागृती' या पत्राचा पहिला अंक दसऱ्याच्या मुहूर्तावर प्रसिध्द. **१९२२:-** प्राचीन मराठी वाङ्मयाचे संशोधक पांडुरंग नारायण कुलकर्णी यांचा जन्म. 'संशोधन धारा' या ग्रंथातून त्यांनी प्राचीन कवींच्या कवितांवर तोपर्यंत झालेल्या संशोधनातील चुका दाखवून निर्णायक मत व्यक्त केले. याशिवाय 'नागेशमहात्म्य'चे संपादन त्यांनी केले. **१९२६:-** लेखिका, संगीत दिग्दर्शिका सरोज रामचंद्र गोखले यांचा जन्म. 'स्वर जुळता भक्तीचे' हा अभंग, भक्तीगीते, गौळण असा गीतसंग्रह त्यांचा प्रसिध्द आहे. **१९३०:-**नाटककार वसंत महादेव जाधव यांचा जन्म. त्यांची वीस एक नाटके, दहा एकांकिका, आकाशवाणीवरुन ४५ श्रृतिका तसेच दूरदर्शनच्या ज्ञानदीप या कार्यक्रमातून २१ नाटिका आणि विविध नियतकालिकांतून लघुकथा प्रसिध्द झाल्या आहेत. 'आकाशाचा रंग निळा', 'कथा ही दोन भावांची', 'गौरीशंकर', 'देवता', 'दैवत' या नाटकांसह 'नवरा विकणे आहे', 'व्यर्थ न हो बलिदान', 'सून माझी गुणांची' ह्या एकांकिका, अशी साहित्य संपदा. **१९३७:-** संगीताचार्य अशोक दामोदर रानडे यांचा जन्म. 'म्युझिकॉलॉजी' (संगीतशास्त्र) या विषयाचे मराठीतील दालन त्यांच्यामुळे समृध्द झाले, 'व्हॉइस कल्चर' (आवाज साधनाशास्त्र) हा शब्दही मराठीत त्यांच्यामुळे रुजला. मुंबई विद्यापीठाच्या संगीत केंद्राचे पहिले संचालक, राष्ट्रीय संगीत नाटय केंद्राचे उपसंचालक म्हणून त्यांनी कामगिरी बजावली. 'भाषणरंग : व्यासपीठ आणि रंगपीठ', 'संगीताचे सौंदर्यशास्त्र', 'लोकसंगीत शास्त्र' अशी मराठी पुस्तके, तर मराठी व भारतीय नाटयसंगीत, चित्रपट संगीत आदींवर इंग्रजी पुस्तके त्यांनी लिहिली होती. जुलै २०११ मध्ये ते निवर्तले. **१९३८:-** ग्रामीण कथाकार आदिनाथ कल्लापा कुरुंदवाडे यांचा जन्म. ह्यांचे 'रक्ताचं नातं' व 'हाडवैर' हे ग्रामीण कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत. **१९४०:-** लेखक श्री. मोहन विष्णूपंत जोशी यांचा जन्म. वर्तमानपत्रे, मासिके चालून शेकडो कथा, कविता, कांदबरी, लेखन. त्यातील काही पुस्तकरुपात प्रसिध्द झाली असून त्याची संख्या ६० च्या आसपास आहे. यात ५ कांदबऱ्या आहेत. 'त्रैलोक्याचे स्वामी' या श्रीनृसिंहसरस्वती महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित कादंबरीची ३ री आवृती निघते आहे. याशिवाय ७ कथासंग्रह, २ ललितलेखसंग्रह, १ एकांकिकासंग्रह, १ कवितासंग्रह हे प्रौढवाङ्मय. शाळा महाविद्यालये-स्पर्धा परीक्षार्थीसाठी 'ज्ञानपीठाचे ज्ञानतपस्वी', 'असे पुरस्कार अशी पारितोषिके', 'भारतरत्न (सर्व ४२ भारतरत्नांची चरित्रात्मक ओळख) हे सर्व संदर्भमूल्य ग्रंथ आहेत. 'शाळेचे दिवस व राष्ट्रपतींची चरित्रे (१२ पुस्तकांचा संच)', 'निवडक पंतप्रधान' अशी ४० बालकुमारांसाठी पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. तसेच 'शब्दगंध', 'गंधरेषा' हा ललित व 'शब्दस्पंदने' हा काव्यसंग्रह आणि काही पुस्तके प्रसिध्दीच्या मार्गावर आहेत. **१९४०:-**कथा, लेखक अनंत रामचंद्र तडवळकर यांचा जन्म. ह्यांचे 'चंगळ', 'पाच तीन दोन' हे विनोदी कथासंग्रह प्रसिध्द झाले आहेत.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# नवी मुंबई विमानतळ परिसरात आता तिसरी मुंबई

## मुंबई महानगरावरील ताण कमी करण्याचा एमएमआरडीएचा प्रयत्न

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई शहरावरावर येणारा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबई शहर विकसीत करण्यात आले. आता दोन्ही या शहरातील पायाभूत सुविधा आणि येथील दळणवळणाच्या सुविधांवर वाढणारा ताण पाहता मुंबई आणि नवी मुंबईला पर्याय देण्यासाठी तिसरी मुंबई विकसीत केली जात आहे.



नवी मुंबई विमानतळानजीकच्या परिसरात एक नवं शहर उभारलं जात आहे. 'थर्ड मुंबई' अर्थात 'तिसरी मुंबई' म्हणून विकसीत केले जाणारे हे शहर तिसरी मुंबई नावाने ओळखले जाणार नाही. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएने या तिसऱ्या मुंबईला खास नाव ठेवले आहे. या नावानेच ही तिसरी मुंबई ओळखली जाणार आहे.

मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणच्या (एमएमआरडीए) माध्यमातून तिसरी मुंबई अर्थात हे नवे शहर निर्माण केले जाणार आहे. ही तिसरी मुंबई जवळपास ३२३ चौरस किलोमीटर क्षेत्रावर विकसीत केली जाणार आहे. या तिसऱ्या मुंबईमध्ये उलवे, पेण, पनवेल, उरण, कर्जत आणि आजुबाजूच्या परिसरातील १०० हून अधिक गावांचा समावेश असेल. यामध्ये 'नैना' प्रकल्पातील गावांचाही समावेश असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. एखाद्या विकसित शहरात ज्या सोईसुविधा नागरिकांना मिळतात. त्या सर्व सुविधा या नव्यानं उभारण्यात येणाऱ्या तिसऱ्या मुंबईमध्ये मिळणार आहेत. या शहराला कनेक्टीव्हीटीच्या उत्तम सुविधा मिळणार आहेत.

**तिसरी मुंबई कोणत्या नावाने ओळखली जाणार?**

एमएमआरडीएने या तिसऱ्या मुंबईला खास नाव ठेवले आहे. कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन अर्थात (केएससी) न्यू टाऊन असे नाव ठेवण्यात आले आहे. या नावानेच ही तिसरी मुंबई ओळखली जाणार आहे. ३२४ चौरस किमी क्षेत्रावर उभारण्यात आलेल्या या न्यू टाऊनमध्ये १२४ गावांचा समावेश आहे. ज्यामध्ये नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नेना) अंतर्गत ८०, खोपटा न्यू टाउन अधिसूचित क्षेत्र अंतर्गत ३३, मुंबई महानगर प्रादेशिक योजनेअंतर्गत २ आणि रायगड प्रादेशिक योजनेअंतर्गत ९ गावांचा समावेश आहे. कर्नाळा पक्षी अभयारण्य तसेच चिरनेर येथील बंदर हे तिसऱ्या मुंबईच्या क्षेत्रात येत आहेत. यामुळे या दोन महत्वाच्या ठिकाणांच्या नावानेच तिसऱ्या मुंबईला कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन असे नाव देण्यात आले आहे.



# ओढ्यात आढळली २३० किलो वजनाची साडेतेरा फुटाची मगर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील पाबरे गावाच्या जवळ एका ओढ्यामध्ये बुधवारी (ता. २३) तब्बल १३.४ फूट लांब व साधारण २३० किलो वजनी मगर आढळली. या मगरीला वनविभाग व सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी सुखरूप रेस्क्यू केले.

बुधवारी सकाळी साधारण १०:३० च्या सुमारास म्हसळा येथून सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्थेच्या सदस्यांना वन विभागाचा फोन आला त्यांनी मगर आल्याची माहिती दिली. माहिती मिळताच सह्याद्री वन्यजीव रक्षणार्थ सामाजिक संस्था घटनास्थळी जाण्यासाठी निघाली. एका तासाभरात टीम घटनास्थळी पोहोचली व बचाव कार्य सुरू करण्यात आले.

मगरीचा आकार मोठा असल्याने बचाव कार्य करण्यासाठी योग्य नियोजन व खबरदारी घेण्यात आली. आणि शिताफीने बचाव कार्य करण्यात आले. वनविभाग व टीमने अगदी सुखरूपणे त्या मगरीला पकडले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२५ ऑक्टोबर**

१) श्री. रवींद्र गंगाराम पाटील
पोयनाड, अलिबाग, २५-१०-१९४९
२) श्रीम. संगीता सुरेश पालवणकर
रामनाथ, अलिबाग, २५-१०-१९५३
३) श्री. चंद्रकांत शंकर ठाकूर
अलिबाग, २५-१०-१९५८
४) श्री. श्रीकांत सदानंद पाटील
अलिबाग, २५-१०-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५**
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# बेळगावमध्ये डिसेंबरला माजी सैनिक मेळावा

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, वीरनारी, वीरमाता, वीरपिता यांच्यावतीने १५ डिसेंबरला दी मराठा लाईट इन्फ्ट्री सेंटर, बेळगाव येथील शिवाजी स्टेडियमवर माजी सैनिक मेळाव्याचे आयोजन केले असल्याची माहिती जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी दिली.

या मेळाव्यात विविध रेकॉर्ड ऑफिसची पथके, वैद्यकीय पथके उपस्थित राहणार आहेत. ही पथके सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा पत्नी, वीरनारी, वीरमाता, वीरपिता यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या निवृत्तीवेतन, माजी सैनिकांच्या पत्नी, वारसाच्या नावात बदल, बँकेशी निगडीत अडचणी, आधार कार्ड व त्यासंबंधी इतर समस्यांचे निरसन करणार आहेत.

संबंधितांनी आपले सैन्यसेवा पुस्तक, माजी सैनिक ओळखपत्र, पीपीओ व बँक पासबुक या कागदपत्रांसह या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# नांदगावात कृषीदूतांकडून शेततळ्याचे प्रात्यक्षिक

**। रत्नागिरी । वृत्तसंस्था ।**

ब्राह्मणेश्वर शैक्षणिक सामाजिक उन्नती मंडळ अंतर्गत राजाराम मराठे कृषी महाविद्यालय फोंडाघाट येथील कृषी पदवीच्या अंतिम वर्षातील कृषी विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरुकता व कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत नांदगाव येथे शेततळ्याचे प्रात्यक्षिक केले.

यावेळी शेतकऱ्यांना शेततळ्याचे महत्त्व पटवून देत कृषी विद्यार्थ्यांनी शेततळे कसे बनवावे, याची माहिती दिली. या प्रात्यक्षिकामध्ये कृषी विद्यार्थी रणजित डोंबाळे, रितेश मोरे, सौरभ पाटील, गणेश भोसले, पांडुरंग मिसाळ, सौरभ पिसे, प्रज्ञेश लळीत, ऋषिकेश जाधव, बालाशिवा, शिवानागेंद्र यांचा सहभाग होता.

# निवडणुकीसाठी ४५०० कर्मचारी नियुक्त

## प्रशासन 'ॲक्शन मोड'मध्ये: भरारी, स्थिर पथकेही तैनात

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

विधानसभा निवडणूकीचे बिगुल वाजल्यानंतर निवडणूक विभागाकडून जोरदार तयारी सुरू आहे. जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदारसंघांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्या नेमणूका जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी केल्या आहेत. ४५०० कर्मचारी तसेच भरारी व स्थिर पथकेही तैनात केली आहेत.



जिल्ह्यात कणकवली, कुडाळ आणि सावंतवाडी तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. या तिन्ही मतदारसंघांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक अधिकारी यांच्या नेमणुका केल्या आहेत. त्यात कणकवलीसाठी कणकवलीचे उपविभागीय अधिकारी जगदिश काकतकर यांची निवडणूक निर्णय अधिकारी व कणकवली तहसीलदार दिक्षांत देशपांडे यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. कुडाळसाठी कुडाळच्या उपविभागीय अधिकारी ऐश्वर्या काळूशे यांची निवडणूक निर्णय अधिकारी व कुडाळ तहसीलदार विरसिंग वसावे यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे. सावंतवाडीसाठी सावंतवाडीचे उपविभागीय अधिकारी हेमंत निकम यांची निवडणूक निर्णय अधिकारी व सावंतवाडीचे तहसीलदार श्रीधर पाटील यांची सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान असले, तरी पूर्व तयारी करण्यासाठी व निवडणूक प्रशिक्षण देऊन कर्मचाऱ्यांना तयारीत ठेवण्यासाठी ४५०० निवडणूक कर्मचारी तैनात केले आहेत. जिल्ह्यात ९२१ मतदान केंद्रे असून मतदान केंद्रावर प्रत्येकी तीन कर्मचारी तसेच २३ नोव्हेंबरला होणाऱ्या मतमोजणीसाठी लागणारे कर्मचारी आणि कार्यालयीन कामासाठी लागणारे कर्मचारी मिळून ४,५०० निवडणूक कर्मचारी म्हणून घेतले आहेत. राजकीय कार्यक्रमांवर भरारी पथकांचे लक्ष निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याबाहेरून येणारी बेकायदेशीर दारू वाहतूक, पैसे, अमली पदार्थ यांच्या वाहतुकीवर लक्ष ठेवणे तसेच संशयित व्यक्तीवर लक्ष ठेवण्यासाठी व्हीडिओ सर्व्हेलन्स टीम, स्थिर व भरारी पथके नेमली असून जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या तपासणी नाक्यांवर ही पथके तैनात केली आहेत. यातील भरारी पथके ही राजकीय कार्यक्रमांवर लक्ष ठेवून राहणार आहेत. विधानसभा निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत वेळ ठेवली आहे. २० नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी मतदान करण्याकरिता सायंकाळी सहापर्यंत मुदत दिली आहे, अशी माहिती निवडणूक विभागाकडून उपलब्ध झाली आहे.

## कोकण रेल्वेच्या वेळापत्रकात बदल

**रायगड :** कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या दिवा-सावंतवाडी एक्स्प्रेस तसेच नेत्रावती एक्स्प्रेसच्या वेळेत येत्या १ नोव्हेंबरपासून बदल होणार आहे. गाड्यांच्या वेगातही वाढ होणार आहे.कोकण रेल्वे मार्गावर पावसाळी वेळापत्रक संपून या मार्गावरील गाड्या नियमित वेळापत्रकानुसार धावणार असल्याने हा बदल होणार आहे. दिवा ते सावंतवाडी दरम्यान धावणारी एक्स्प्रेस ही गाडी रत्नागिरी स्थानकावर सुरू असलेल्या पावसाळी वेळापत्रकाच्या तुलनेत २० मिनिटे आधी म्हणजे २ वाजून ५ मिनिटांनी येणार आहे. या गाडीबरोबरच रत्नागिरी ते दिवा दरम्यान धावणाऱ्या एक्स्प्रेस गाडीच्या वेळेतदेखील थोडासा बदल होणार आहे.याशिवाय कोकण रेल्वे मार्गे धावणारी १६३४५ क्रमांकाची नेत्रावती एक्स्प्रेस गाडी १ नोव्हेंबरपासून नव्या वेळापत्रकानुसार धावणार आहे.

# कणकवली 'कोमसाप'च्या शाखाध्यक्षपदी माधव कदम

## कार्यवाहपदी सिद्धेश खटावकर यांची निवड

**। कणकवली । वृत्तसंस्था ।**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कणकवली शाखेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार, लेखक माधव कदम यांची तर कार्यवाहपदी सिद्धेश खटावकर यांची निवड करण्यात आली.

'कोमसाप'चे जिल्हाध्यक्ष मंगेश मसके यांच्या अध्यक्षतेखाली आणि जिल्हा समन्वयक रूजारिओ पिंटो, सुरेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील हॉटेल अप्पर डेकच्या सभागृहात आयोजित बैठकीत नूतन कार्यकारी मंडळाची सर्वानुमते निवड केली.

कणकवली मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक, ज्येष्ठ साहित्यिक, पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या सुचनेनुसार येथील साहित्यिक, पत्रकार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची बैठक झाली. कोमसापचे जिल्हाध्यक्ष मंगेश मसके अध्यक्षस्थानी होते. या वेळी श्री. मसके यांनी सर्वानुमते कणकवली शाखेच्या नूतन कार्यकारी मंडळाची निवड केली. यात तालुका शाखाध्यक्ष माधव कदम, जिल्हा प्रतिनिधी आर्किटेक्ट, उद्योजक संदीप वालावलकर, उपाध्यक्ष राजस रेगे, खजिनदार डॉ. सतीश कामत, कार्यवाह सिद्धेश खटावकर, कार्यकारी मंडळ सदस्य गणेश जेठे, महेश काणेकर, डॉ. मिलिंद कुलकर्णी, अशोक करंबेळकर, चिराग बांदेकर, अमर पवार, रिमा भोसले, अभय खडपकर, धाकू तानावडे, नीलेश ठाकूर, लक्ष्मण नारकर, गीतांजली कुलकर्णी यांची निवड झाली. कणकवली शाखेच्या नूतन कार्यकारी मंडळाचे कोमसापचे संस्थापक मधू मंगेश कर्णिक आणि डॉ. प्रदिप ढवळ यांनी अभिनंदन केले.

## सोनवी पुलावर खड्ड्यांसह चिखल

**संगमेश्वर :** मुंबई-गोवा महामार्गावरील सोनवी पुलावर खड्डेच खड्डे पडले असून पूल धोकादायक झाला आहे. संगमेश्वरजवळच्या आरवली ते बावनदी या अपघातप्रवण क्षेत्रात पूल धोकादायक बनले आहेत. महामार्गावरील पुलांवर पडत असलेल्या खड्ड्यांमुळे वाहन अडकून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठेकेदार कंपनीसह बांधकाम विभागाचे कर्मचारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप वाहनचालकांनी आणि पादचाऱ्यांनी केला आहे. याबाबत भाजपचे सरचिटणीस सतीश पटेल यांनी ठेकेदार कंपनीला सांगितल्यानंतर तात्पुरते खड्डे बुजविले होते. मात्र नंतर पुन्हा खड्डे पडले आहेत. तसेच पावसामुळे या पुलावर खड्ड्यांबरोबरच चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. पाऊस पडल्यानंतर तलावाचे स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे वाहनचालकांची डोकेदुखी आणखीनच वाढली आहे.

# कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी धावली महाराष्ट्र कर्मचारी युनियन

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

परिवहन सेवेत काम करीत असताना झालेल्या अपघातात जखमी झालेल्या चालकाच्या उपचाराचा खर्च महापालिका प्रशासनाने न केल्यास संबंधित कर्मचाऱ्याच्या उपचाराचा सर्व खर्च महाराष्ट्र कर्मचारी युनियन करणार असल्याची माहिती कामगार नेते व महाराष्ट्र कर्मचारी युनियनचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी दिली.

कामगार नेते रविंद्र सावंत हे मोरोक्को येथे आयटीएफच्या जागतिक परिषदेसाठी गेले होते. नवी मुंबईतील कर्मचाऱ्यांच्या समस्या, असुविधा याला जागतिक व्यासपिठावरुन वाचा फोडल्यावर आठ दिवसांनी भारतात आले असता त्यांनी मुंबई विमानतळावरुन घरी न जाता थेट वाशीतील प्रथम रुग्णालयात धाव घेत संबंधित कर्मचाऱ्याची भेट घेतली. कर्मचाऱ्यांना मेडीक्लेम नाही, आरोग्य सुविधा नाही, उपचाराचा खर्च दिला जात नाही, उपचारासाठी गैरहजर राहिल्यास वेतनातून कपात केली जाते. वारंवार पाठपुरावा करुनही पालिका प्रशासन कर्मचाऱ्यांच्या आरोग्याबाबत, उपचाराबाबत उदासिनता दाखवित असल्याचा संताप व्यक्त करत महापालिकेने कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडले असल्याचा आरोप कामगार नेते रवींद्र सावंत यांनी यावेळी केला.

रुग्णालयातील डॉक्टरांची भेट घेत जखमी कर्मचाऱ्याच्या प्रकृतीबाबत व उपचाराबाबत माहिती जाणून घेतली. त्या ठिकाणहूनच परिवहन व्यवस्थापक यांना मोबाईल वर कॉल करून कामगार नेते रविंद्र सावंत यांनी डॉक्टरांशी बोलणी करून दिली. खर्चाची जबाबदारी परिवहन व्यवस्थापकांनी घेतली आहे. तथापि परिवहनने खर्च न केल्यास महाराष्ट्र कर्मचारी युनियन जखमी चालकाच्या उपचाराचा सर्व खर्च करेल, अशी माहिती कामगार नेते रविंद्र सावंत यांनी यावेळी दिली.

## हयात दाखल देण्याचे आवाहन

**सिंधुदुर्गनगरी :** सुवर्ण महोत्सवी योजनेअंतर्गत अनुदान घेणाऱ्या शहीद जवानांच्या पत्नींनी दरवर्षीप्रमाणे त्या हयात असल्याबाबतचा दाखला सही व शिक्क्यासह प्राप्त करून घेऊन त्यासोबत माजी सैनिक विधवा पत्नी ओळखपत्र व बँक पासबुकच्या छायांकीत प्रतीसह २० नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. लाभार्थी वयोवृध्द असल्याने शासनाच्या नियमानुसार वर्षातून प्रत्येक सहा महिन्यांनी ३१ मे व ३० नोव्हेंबरला हयातीचे दाखले घेऊनच अनुदान अदा करण्याचे निर्देश आहेत.

# बागायतदारांच्या खात्यात पीक विमा परतावा जमा

**। सिंधुदुर्ग । वृत्तसंस्था ।**

आंबा, काजू बागायतदारांच्या खात्यात पीक विमा परतावा जमा होण्यास सोमवार (दि.२१) पासून सुरूवात झाली आहे. पीक परताव्यातून वगळलेल्या ९ मंडलांना देखील परतावा मिळणार आहे. परताव्याच्या रक्कमेत सुमारे एक कोटीने वाढ झाली आहे. पीक परताव्याकरीता गेले दीड दोन महिने जिल्ह्यातील शेतकरी आक्रमक झाले होते.



हवामानावर आधारीत पीक विमा योजनेत सिंधुदुर्गातील आंबा आणि काजू पिकांचा समावेश आहे. आंबा पिकाखालील १४ हजार ६६८ हेक्टर क्षेत्र तर काजू पिकाखालील ५ हजार २४३ हेक्टर क्षेत्र असे एकूण १९ हजार ९११ हेक्टर क्षेत्र संरक्षित करण्यात आले. या योजनेत जिल्ह्यातील ४२ हजार १९० शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. गेल्या महिना दीड महिन्यापासून सातत्याने पीक परतावा मिळावा यासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू होते. पीक विमा कंपनीने सुरूवातीला ५७ पैकी ५६ मंडलातील आंबा पिकाला आणि ४६ मंडलातील काजु पिकाला ६७ कोटी ९४ लाख ३ हजार ४८० रूपये पीक विमा परतावा मंजुर केला होता. त्यानंतर काजुपिकाकरीता वगळलेल्या १० पैकी ९ मंडलामध्ये स्वयंचलित केंद्रे नसल्यामुळे या मंडलातील शेतकऱ्यांना नजीकच्या मंडलातील नोंदीप्रमाणे परतावा मिळावा याकरीता कृषी विभागाचे प्रयत्न सुरू होते. आता ९ मंडलांना परतावा मिळणार आहे. त्यामुळे पिक परताव्याची रक्कमेत १ कोटी रूपयांची वाढ झाली आहे.

> **जिल्ह्यातील आंबा, काजू बागायतदारांना पिक विमा परतावा सोमवारपासून मिळण्यास सुरुवात झाली आहे. काजु पिकासाठी वगळलेल्या मंडळांना देखील परतावा मिळत आहे.**
>
> **- अरूण नातु, तांत्रिक अधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, सिंधुदुर्ग**

## ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम ही नवीन प्रणाली लागणार

# महामार्गावरील टोल वसुलीचे नवे तंत्र

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**महामार्गांवरील टोल आकारणीबाबत ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाईट सिस्टिम अर्थात जीएनएसएस ही नवीन प्रणाली लागू करण्यात येणार आहे. सध्या बंगळूर-म्हैसूर आणि पानिपत-हिसार महामार्गावर याची चाचणी सुरू झाली असून त्याचे सकारात्मक परिणाम हाती पडत आहेत. कालांतराने संपूर्ण देशभरात ही पद्धत लागू होणार आहे. सध्या नॅशनल हायवे ॲथोरिटी ऑफ इंडियाला सुमारे ४० हजार कोटी रुपयांचा महसूल टोलच्या माध्यमातून मिळतो आणि ही सिस्टीम लागू झाल्यानंतर हे उत्पन्न १ लाख ४० हजार कोटी रुपयांवर जाण्याची अपेक्षा आहे.**



महामार्गांवर दिसणाऱ्या टोल नाक्यांच्या जाळ्यातून वाहनधारकांची लवकरच सुटका होणार असल्याची चर्चा आहे. याचा अर्थ टोल वसुली बंद होणार नाहीये, तर वाहनधारकांना टोल भरावाच लागेल; पण त्यासाठी टोल नाक्यांवर थांबण्याची गरज उरणार नाही. यासाठी जीएनएसएस तंत्रज्ञान पद्धतीचा वापर केला जाणार आहे. सध्या देशातील दोन महामार्गांवर ही प्रणाली लागू केली आहे. टोल संकलनाची ही नवी व्यवस्था आहे. महामार्गावरून प्रवास करत असाल, तर गाडीचा टोल आपोआप कापून घेतला जाईल.

ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टीम (जीएनएसएस) जीपीएस आधारित काम करेल. यासाठी केंद्रीय रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने नियम जारी केले आहेत. जीएनएसएस युक्त वाहनांना २० किलोमीटरपर्यंत राष्ट्रीय परवाना असलेल्या वाहने वगळता अन्य जीपीएसयुक्त वाहन राष्ट्रीय महामार्गाचा एखादा भाग वापरत असेल, तर त्या गाडीला एका दिवसात एका दिशेने वीस किलोमीटरपर्यंतचा प्रवास मोफत राहील आणि कोणताही टोल आकारला जाणार नाही. याशिवाय वाहन जेवढा लांबचा पल्ला गाठेल, तेवढ्या प्रमाणात टोल भरावा लागेल. गाडी जीएनएसएस तंत्रज्ञानयुक्त असेल, तरच लाभ मिळणार आहे. वाहनात ऑन बोर्ड युनिट ओबीय किंवा ट्रॅकिंग उपकरण बसवावे लागेल. हे उपकरण चार हजार रुपयांना असून ते मालकाला स्वत:च बसवावे लागेल.

जीएनएसएस या नव्या पद्धतीत टोल वसुलीमुळे प्रवास चांगला आणि वेगवान होण्याची शक्यता आहे, तरीही लोकांत या सिस्टीमवरून संभ्रम आहे. कारण, सध्याची टोल भरणा प्रणाली फास्टॅग बंद होईल की सक्रिय राहील, यावरून स्पष्टता नाही. क्रिसिलने म्हटले, फास्टॅगला बदलले जाणार नाही; मात्र कदाचित फास्टॅगच नव्या पद्धतीसह लागू केले जाईल. सध्या अंमलात आणलेले नवे नियम कोठे लागू होतील, हेही उघड झालेले नाही. जीएनएसएस टोल असणाऱ्या सिस्टीमला देशभरात लागू कण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली जात आहे. काम पूर्ण होताच ही सिस्टीम सुरू होईल. प्रारंभीच्या टप्प्यात जीएनएसएस टोल सिस्टीम केवळ व्यावसायिक गाड्यांवरच लागू होईल. देशातील कोणतेही महामार्ग व एक्स्प्रेस वेवर दररोज वीस किलोमीटरपर्यंतचा प्रवास (ये-जा) करण्यासाठी टोल आकारला जाणार नाही; पण एखाद्याने २१ किलोमीटरपर्यंतचा प्रवास केला असेल, तर पहिल्या किलोमीटरपासून टोल आकारला जाईथल.जीएनएसएस हे दोन तंत्रज्ञानावर आधारित आहे. पहिले तंत्रज्ञान वाहनांतील जीपीएस ट्रॅकिंग प्रणालीवर आधारित आहे. दुसरे तंत्रज्ञान नंबर प्लेटवर आधारित आहे. नंबर प्लेटवर टोलसाठी संगणकीकृत प्रणाली असेल आणि ती सॉफ्टवेअरच्या मदतीने टोल वसूल करण्यात मदत करेल. या तंत्रज्ञानात महामार्गावर वाहन कोणत्या पॉईंटवरून प्रवेश करेल, त्याची माहिती नोंदविली जाईल. यानंतर गाडी ज्या पॉईंटवर जाईल, तिथेही नोंदणी केली जाईल. यादरम्यान महामार्गावर वाहनाने किती किलोमीटर प्रवास केला, या आधारे गाडी मालकाच्या खात्यातून टोल काढून घेतला जाईल.महामार्ग तज्ज्ञांच्या मते, जीएनएसएस लागू झाल्यानंतर महामार्गावर प्रवेश करणे हाच टोलचा एंट्री पॉईंट असेल. महामार्गाचा स्पर्श होताच मीटर सुरू होईल. स्थानिक लोकांना टोल गेटने वीस किलोमीटरपर्यंत जाण्याची मुभा आहे.

# सुतारवाडीतील शेतकऱ्यांवर संकट

## ■ पावसासह रानडुक्कर व माकडांचा हैदोस



**। सुतारवाडी । वार्ताहर ।**
**रोहा तालुक्यातील सुतारवाडी परिसरातील म्हसकरवाडी, हेटवणे, वाळंजवाडी, ढोकळेवाडी, सुतारवाडी, आंबिवली यांच्यासहित आजूबाजूच्या असंख्य गावातील भातशेती पावसासहित रानडुक्कर व माकडांनी जमीनदोस्त केली आहे. यामुळे भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. या दुहेरी संकटांचा सामना करताना येथील शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. तसेच, नुकसान झालेल्या भातशेतीचे पंचनामे करून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**

यावर्षी समाधानकारक पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला होता. तो अंदाज खरा ठरत जुन महिन्याच्या सुरुवाती पासून पाऊस उत्तम प्रकारे झाला. यामुळे भात लागवड वेळेवर करण्यात आली. भातपीक उत्तम आल्यामुळे शेतकरी समाधानी दिसत होता. परंतु, हे समाधान फार काळ टिकू शकले नाही. कारण हातातोंडांशी आलेले पीक परतीच्या पावसाने हिरावून नेला असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. दरवर्षी दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात होत असून ती दिवाळी पूर्वी बांधणी करून पूर्ण होत असे. परंतु, यावर्षी दिवाळी जवळ आली तरी परतीचा पाऊस जोरदार सुरु असल्यामुळे भातशेती कापणीला विलंब होत आहे.

यातच गेले काही दिवस वादळी वाऱ्यासह सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे शेतात पाणी साचल्यामुळे उभे पीक आडवे झाले असून पीक कुजत चालले आहे. यातच सुतारवाडील असंख्य गावे जंगल परिसरातील असुन येथे रानडुक्कर व माकडांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ही जनावरे शेतात हैदोस घालत असून उरल्या सुरलेल्या पीकांचे नुकसान करत आहेत. याचा मोठा फटका शेतकरी वर्गाला बसत असुन शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. यामुळे नुकसान झालेल्या भातशेतीचे तात्काळ पंचनामे करुन भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातुन केली जात आहे.

> **“एकीकडे भात, नाचणी, वरी या पिकांची नासाडी रानडुक्कर व माकडे करीत असुन दुसरीकडे परतीचा पाऊस सुरु असल्यामुळे भातशेती पूर्णपणे आडवी झाली आहे. याचा फटका शेतकरी वर्गाला बसला असुन शेतकरी हवालदील झाला आहे.**
> **– सुरेश वाळंज, शेतकरी, हेटवणे”**

> **“रायगड जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यावसाय हा शेती हा आहे. यामुळे या जिल्ह्याला भाताचे कोठार असे म्हटले जाते. नांगरणी, खते, मजुरीचा खर्च वाढत चालला असला तरी येथील शेतकरी भातशेती करीत असतो. परंतु, वन्यप्राणी व परतीच्या पावसामुळे हातातोंडांशी आलेले पीक हिरावले जात आहे. यामुळे भातशेतीचे पंचनामे करून भरपाई मिळावी.**
> **– कृष्णा जाधव, शेतकरी, आंबिवली”**

## अमाईन्स केमिकल्सचा स्तुत्य उपक्रम



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**
वडगाव येथील रायगड जिल्हा परिषद शाळा विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबतच विविध उपक्रम हाती घेत असते. त्यांची बोद्धिक क्षमता वाढावी या उद्देशाने ‘माझी शाळा, स्वच्छ शाळा’ या उपक्रम अंतर्गत सामान्यज्ञान, घोषवाक्य, चित्रकला अश्या विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामान्यज्ञान स्पर्धेत देवेन पोपेटे, यश पाटील, घोषवाक्य स्पर्धेत कृतिका गडगे, कस्तुरी जाधव, चित्रकला रंगभरण स्पर्धेत समर्थ मुंढे, अद्विक शिंदे तसेच बेस्ट क्लासरूम स्पर्धेत पहीली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. ही पारितोषिके अमाईन्स केमिकल्स या सी.एस.आर. फंडातून देण्यात आली. यावेळी वडगाव राजिप शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचा शारिरीक तसेच बोद्धिक विकास व्हावा यासाठी विविध स्पर्धेचे आयोजन केले जात असते. त्यांच्या विकासासाठी आशा स्पर्धा होणे आवश्यक आहे.

## ‘सायबर लॉ’ चे ज्ञान आवश्यक : न्या.साटोट

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**
हल्लीच्या काळात सायबर लॉचे ज्ञान आवश्यक झाले आहे. म्हणूनच समजेल तेवढाच मोबाईलचा वापर करावा, असे उद्गार श्रीवर्धनचे न्यायाधीश ए.एस. साटोटे यांनी काढले आहेत. श्रीवर्धन न्यायालयात बुधवारी (दि.२३) ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित केलेल्या कायदेविषयक शिबिरात ते बोलत होते. तसेच, ज्येष्ठ नागरिकांना संरक्षण देण्यासाठी कायदा बनवावा लागतो ही शोकांतिका आहे, असेही ते आपल्या मार्गदर्शनात म्हणाले. या शिबिरामध्ये ॲड. संतोष सापते यांनी सायबर सिक्युरिटीबद्दल मार्गदर्शन करताना सायबर गुन्ह्यांची वेगवेगळी उदाहरणे सांगून मोबाईलचा वापर अतिशय सावधपणे करणे आवश्यक आहे, असे निदर्शनास आणले. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. इसाने, ॲड. वढावकर, ॲड. वावेकर, ॲड. ठोसर, ॲड. लाड व अन्य वकील वर्गही उपस्थित होते.

## नगरपरिषद कर्मचाऱ्यांना बोनसची मागणी



**। कर्जत । वार्ताहर ।**
कर्जत नगरपरिषदमध्ये लेबर फ्रंट (आयटक संलग्न) कॉ. श्याम गायकवाड यांची युनियन आहे. त्यांनी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी बोनस मिळण्याची मागणी एका निवेदनाद्वारे नगरपरिषद प्रशासनाला केली आहे. हे निवेदन लेबर फ्रंट कर्जतचे युनिट अध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे यांना दिले आहे. कर्जत नगर परिषदेमध्ये सुमारे ६५ कर्मचारी असून प्रत्येकी २८ हजार रूपये बोनस मिळण्याची मागणी युनियन तर्फे करण्यात आली आहे. याबाबत आता नगरपरिषद प्रशासन काय निर्णय घेते, याकडे लक्ष लागले आहे. यावेळी आस्थापना प्रमुख अविनाश पवार, सभा कामकाज प्रमुख कल्याणी लोखंडे, कर विभाग प्रमुख ऋषिता शिंदे उपस्थित होते.

## निवडणूक साक्षरता कार्यक्रम संपन्न

**। माणगाव । प्रतिनिधी ।**
माणगावच्या द. ग. तटकरे महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी (दि.२४) निवडणूक साक्षरता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विधानसभा निवडणूकांच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता आणि मोठ्या प्रमाणात मतदान व्हावे यासाठी निवडणूक साक्षरता शपथ देण्यात आली.

## रविंद्र म्हात्रे यांचे निधन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
उरण तालुक्यातील आवरे येथील रविंद्र मारुती म्हात्रे यांचे शनिवारी (दि.१९) निधन झाले. निधना समयी ते ४४ वर्षांचे होते. आवरे येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, आई-वडील, एक भाऊ, तीन बहिणी असा मोठा परिवार आहे. रविंद्र म्हात्रे यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि.२८) खोपटे येथील नाना नानी पार्क येथे सकाळी ८:०० वाजता होणार आहे. तर, उत्तरकार्यविधी बुधवारी (दि.३०) उरण तालुक्यातील आवरे येथील राहत्या घरी सकाळी ११:०० वाजता होणार असल्याची माहिती म्हात्रे परिवाराकडून देण्यात आली आहे.



## पाचनंद शाळा सुंदर शाळा

**। पनवेल । वार्ताहर ।**
मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात राज्यातील अनेक शाळांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला असून हे अभियान यशस्वी होण्यासाठी योगदान दिले आहे. या अभियानामध्ये पनवेल तालुक्यातील तळोजा येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक पाचनंद शाळेने देखील सहभाग घेतला होता. यावेळी शाळेने नवनिर्मितीचा ध्यास घेत या स्पर्धेत एक वेगळी छाप पाडत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान मिळवला आहे. यावेळी पाचनंद शाळेने तालुका व जिल्हास्तरीय कमिटीसमोर शाळेच्या विद्यार्थ्यांनी इत्यंभूत माहिती सांगितली. तसेच, विद्यार्थ्यांनी शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांना परसबाग, स्टीम लॅब, वाचनालय, क्रीडा विभाग, वर्ग खोल्या व शालेय परिसराची माहिती दिली. याचबरोबर पाचनंद शाळेने परसबागेतील विविध भाज्या, तंबाखूमुक्त शाळा, स्वच्छ व तंबाखूमुक्त शालेय परिसर या प्रमाणपत्रासहित साक्षांकित असलेली शाळा तर स्वच्छता मॉनिटर या उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करून त्यातही विद्यार्थ्यांनी देखील बक्षीस मिळवले आहे.



## पोलीस आयुक्तालय पुनर्रचनेचा प्रस्ताव

**। पनवेल । वार्ताहर ।**
पनवेल परिसरात होत असलेले आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नव्याने भर पडणारे विविध प्रकल्प, आयटी कंपन्यांमुळे नवी मुंबई, पनवेल, उरण परिरसराची लोकसंख्या झपाट्यााने वाढत आहे. त्याम ानाने उपलब्ध पोलीस ठाण्यांवर प्रचंड ताण पडू लागला आहे. यामुळे कायदासुव्यस्थेचा प्रश्न देखील निर्माण होऊ लागल्याने नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने परिमंडळ-३चा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. या प्रस्तावामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात १ पोलीस उपआयुक्त, २ सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच ४ नवीन पोलीस ठाणेंची भर पडणार आहे. या प्रस्तावावर विधानसभा निवडणुकीनंतरच निर्णय होण्याची शक्यता असल्याने नवीन परिमंडळासाठी आणखी काही महिन्यांची वाट पहावी लागणार आहे.

## नव मतदार नोंदणी संपन्न

**। उरण । वार्ताहर ।**
उरण तालुक्यातील रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे येथील निवडणूक साक्षरता मंडळ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी संसद मंडळ, सांस्कृतिक विभाग व निवडणूक साक्षरता मंडळाच्या माध्यमातून अगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूीवर निवडणूक आयोगाने केलेल्या अहवानानुसार नव मतदारांबद्दलचा संक्षिप्त कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाविद्यालयातच आय. टी. विभागाच्या विशेष सहकार्याने नुकतेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया राबविण्यात आली.

डॉ. संदीप घोडके यांच्या संकल्पनेतून राज्यशास्त्र व निवडणूक साक्षरता मंडळ दरवर्षी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात नव मतदारांची नोंदणी राबवत असते. परंतु, पुढील महिन्यात होत असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जास्तीत जास्त मतदार निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावेत या उद्देशाने हा विशेष संक्षिप्त मतदार नोंदणी कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह परिसरातील एकूण ३६० दरम्यान मतदारांची नोंदणी यशस्वीपणे करण्यात आली. या नव मतदारांना मतदानाचा हक्क देणाऱ्या, लोकशाही बळकट करणाऱ्या व मतदानाची टक्केवारी वाढविणाऱ्या अनोख्या उपक्रमाबद्दल उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम व नायब तहसीलदार अधिकारी वर्गाने महाविद्यालयाच्या निवडणूक साक्षरता मंडळाचे कौतुक केले आहे.



## मतदान जनजागृती अभियान

**। उरण । वार्ताहर ।**
यु.ई. एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या एनएसएस आणि डीएलएलई व मतदान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती अभियान कार्यक्रमाचे गुरुवारी (दि.२४) आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते जगजीवन भोईर यांनी विद्यार्थ्यांना नवीन मतदार ओळखपत्राची नोंदणी ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने कशी करायची याची प्रक्रिया सांगितली. तसेच, मतदानाच्या अधिकाराविषयी जागरूक होण्यासाठी मार्गदर्शन केले. यानंतर विदयार्थ्यांनी निवडणूक जनजागृतीची शपथ घेतली. या कार्यक्रमाला सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, शिक्षक आणि एकूण ५८ विदयार्थी उपस्थित होते.



## रोह्यात किल्ले स्पर्धेचे आयोजन

**धाटाव :** रोहा तालुका सकल मराठा समाजाच्यावतीने किल्ले स्पर्धेचे आयोजन केले आहे. रोह्यात म्हाडा कॉलनी येथे आयोजित केलेल्या या स्पर्धांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय आणि चतुर्थ क्रमांकाबरोबर उत्तेजनार्थ विजेत्यांना सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेमध्ये असंख्य इच्छुकांनी सहभागी होण्यासाठी रोह्यात नितीन परब यांच्या कार्यालयात नोंदणी करावी, असे आवाहन प्रदीप देशमुख यांनी केले आहे. याकरिता अरुण साळुंखे, नाना दळवी, सचिन दळवी, सुहास येरूनकर, विजय शिंदे, सूर्यकांत मोरे, संदीप सावंत, संतोष पार्टे, जीवन देशमुख, प्रशांत देशमुख, हर्षद साळवी, चेतन कामथे यांच्याशी संपर्क साधावा असेही सांगण्यात आले आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलसाठी मावशी (आया) हवी आहे. संपर्क : ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०६
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सन स्टोन रीयल इस्टेट साईना कॉम्प्लेक्स बायपास रोड चर्चच्या समोर N.A. प्लॉट अलिबाग परिसरात आहेत. लहान फार्म हाऊस प्लॉट स्वतंत्र ७ X १२ ८६६९००६९०२, ९२७०८८८८०३
- संपर्क संस्था पोयनाड (अलिबाग) बालग्रामसाठी १) अधीक्षक, २) सोशल वर्कर, ३) समुपदेशक पदे त्वरीत भरणे आहे. संपर्क- ९७६६५४२१७५, इमेल - samparc@gmail.com
- कल्पवृक्ष रिसॉर्ट वरसोली येथील किचन चालवायाला देणे आहे. संपर्क - ९३७३९७८९२५/ ९६८९५६७१०१
- सर्वसामान्यांना परवडणाऱ्या किंमतीतील घर पोयनाड अलिबाग येथे उपलब्ध Collector /Bank Approved Project 1RK & 1BHK. Starting price 12.25 Lac Onwards. Diwali Offer. Booking 50,000 /- only Call + 7700999220/ 9022272212.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## पक्षी गणना कार्यक्रमाचे आयोजन

# निसर्ग प्रेमींसाठी एक अनोखी संधी

**। मुरुड-जंजिरा। वार्ताहर ।**
**पक्षी निरीक्षक आणि निसर्ग प्रेमींसाठी एक अनोखी संधी फणसाड वन्यजीव अभयारण्यात आयोजित करण्यात आली आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन २५ ते २७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. ग्रीन वर्कस् ट्रस्ट आणि फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने तसेच महाराष्ट्र वन विभाग ठाणे वन्यजीव विभागाच्या सहकार्याने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.**



या कार्यक्रमाचा उद्देश फणसाड वन्यजीव अभयारण्यातील पक्षी जीवनाचे निरीक्षण व नोंदणी करणे असुन फणसाड पक्षी गणना हे दीर्घकालीन पक्षी सर्वेक्षण फाऊंडेशनच्या कार्यक्रमांतर्गत येते. हा उपक्रम वैज्ञानिक पद्धतीने नागरिकांच्या मदतीने दि. २५ ते २७ ऑक्टोबर रोजी राबविला जाणार आहे. तरी पक्षी जीवनाचे निरीक्षण आणि नोंदणी करण्यासाठी इच्छुकांनी सहभागी होण्यासाठी भारतीय नागरिक असणे आवश्यक आहे. तसेच, नोंदणीसाठी १८ वर्षांवरील व्यक्तीच अर्ज करू शकतात.

या व्यक्तींना तीन दिवसांत जंगलामधून अंदाजे २५ किमी अंतर चालण्याची क्षमता असावी. सोबत स्वतःची दुर्बीण असणे आवश्यक आहे. अर्जदारांची निवड नोंदणीच्या वेळी दिलेल्या माहितीनुसार केली जाईल आणि निवड झालेल्या सहभागी व्यक्तींना ई-मेलद्वारे कळवले जाणार आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी होणाऱ्या ओरिएंटेशन सेशनला निवड झालेल्यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे, अन्यथा सहभागींची निवड रद्द केली जाईल. अधिक माहितीसाठी ग्रीन वर्कस् ट्रस्ट (८७७९४०९४६०) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन वन्यजीव तज्ज्ञ डॉ. निखील भोपळे केले आहे.

## पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन

**। खांब । वार्ताहर ।**
रोहा तालुक्यातील खांब ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन दि.३० ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात आले आहे. कृष्णा जाधव यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होणाऱ्या या दिंडी सोहळ्याला बुधवारी (दि.३०) सकाळी ७:०० वाजता खांब येथील विठ्ठल मंदिरातून प्रारंभ होणार आहे. या दिंडी सोहळ्याचे मार्गदर्शक मारूती कोलाटकर, सदानंद जाधव, कृष्णाराम धनवी,अजय पारठे, प्रकाश थिटे, ज्ञानेश्वर लोखंडे, गणेश जाधव, एकनाथ मरवडे, शुभांगी महाडिक, राधिका लोखंडे आदींसह रामचंद्र जाधव, शांताराम महाडिक, देविदास भोईर, भरत कान्हेकर, लक्ष्मण भोसले, नथुराम जाधव, राम लोखंडे, काशिनाथ कान्हेकर मोलाचे सहकार्य करीत आहेत. ज्या भाविकांना या सोहळ्यात सहभागी व्हायचे असेल त्यांनी आपले आधारकार्ड सोबत आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिशीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत मी मिळकतीचे मालक श्री. मोतीराम महादु पाटील यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले असून तशी बोलणी चालू आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आवेटी | १९१ | ०-१३-४० | ३.३१ |

सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी दिलेला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकारार, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क, व हितसंबंध वा दुरान्वये संबंध असल्यास अशा व्यक्तीने आपल्या हरकती लेखी स्वरूपात, कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार याजकडे हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध असून तिचे मार्केटेबल टायटल क्लिअर आहे, असे समजून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. २४/१०/२०२४

**(ॲड. वैभव गिरीधर पाटील)**
जिल्हा न्यायालय अलिबाग, रायगड
मु. सांबरी, पो. कुर्डूस,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ८८०५५१८०६८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाच्या मिळकती खालील नमुद मिळकतीचे विद्यमान मालक यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-धोंडसे, ता. सुधागड, जि. रायगड**

| मिळकत मालकाचे नाव | सर्व्हे नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| श्री.सुनिल राम राउत वगैरे ४ रा.पाली, ता.सुधागड, जि.रायगड | ६१/२ | ०.६३.०० | ९.०३ |
| | ८/१ | २-००-०० | १.०० |
| श्री. हरिश्चंद्र अनंत जाधव वगैरे ९ रा.धोंडसे, ता.सुधागड, जि.रायगड | ६/१ | ०.५१.०० | ०.०५ |
| | पैकी मिळकत विक्री क्षेत्र ०-२०-० हे.आर. | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २५/१०/२०२४

सही /-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि.रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे नसरापूर व मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमीन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अंकुश गंगाराम देसाई यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे नसरापूर, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६१ | १/ड | ०-४५-०० | ०-३२ |
| ६१ | १/ड/३ | ०-६२-८० | ०-६५ |

**मौजे मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ३ | ३ | ०-२७-४० | १-६९ |
| ३ | ७ | ०-३६-०० | ३-०१ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २५/१०/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुदे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) संदर्भामध्ये आरती रामकृष्णन (''मालक'') यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य काही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/ किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

**अनुसूची (मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-टेकाळी, तालुका -अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित गट क्रमांक व उपविभाग २५, एकूण क्षेत्र ००.९३.९० (हे. आर. चौ. मी.) आकार १९ रु. ८१ पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग आणि खालील प्रमाणे सीमाबद्धः

उत्तरेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग ५० आणि ५१
दक्षिणेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग ३४ आणि ३६
पूर्वेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग १८, १९, २०, २१, २२, २३, २४, २६, २७, २८, ३० आणि ३१
पश्चिमेस आणि त्या दिशेने : गट क्रमांक व उपविभाग ३७, ३८ आणि ४७

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/१०/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक धर्मीचंद नानुराम खिची वगैरे २, रा. सिध्दिविनायक बिल्डींग खांदा कॉलनी पनवेल यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे दर्यागांव, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १ | ९-२१-१० | १२.०६ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तीनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २५/१०/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९४०३३०५२५०, ९२०९२९६७२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक अब्दुल रज्जाक कासम, रा. भायखळा, मुंबई यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कानसळ, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ८६/१ | ०-०७-२० | ६.८७ |
| ८७ | ०-२२-२० | २.५० |
| ८८ | ०-३९-८० | ४.६२ |

वरील मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २५/१०/२०२४

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर
नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९४०३३०५२५०, ९२०९२९६७२५

## हरवले आहे

इला महापात्रा रा.अलिबाग, जि.रायगड यांचा आयफोन १४ शनिवारी अलिबाग मार्केटमधील रिलायन्स ट्रेंडस ते एच.डी.एफ.सी.बँक अलिबाग या दरम्यान हरविला आहे. तो फोन लॉक असल्यामुळे इतर कोणीही त्याचा वापर करू शकत नाही. जर तो कोणाला सापडला असल्यास कृपया ९४४८५२१३८९ या नंबरवर संपर्क करावा.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे लोणारे ता.अलिबाग, येथील खालील नमूद वर्णनाची जमीन मिळकत श्री. भगवान धर्मा पाटील वगैरे रा. लोणारे, पो. थळ, ता. अलिबाग जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील जमीन मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे. सदर जमीन मिळकत पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विकी, गहाण, दान, भाडेपटटा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट इजमेंटरी हक्क, जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या वहिवाटिचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिध्द झाल्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| लोणारे, ता. अलिबाग जि. रायगड | १४/३ | ०-१०-४० पो.ख. ०-०७-३० एकूण ०-१७-७० | ०.९८ |

अलिबाग
दिनांक : २४/१०/२०२४

सही/-
**(ॲड. वैभव वसंत पाटील )**
रा. नवेदर बेली, ता. अलिबाग
जि. रायगड, मो ९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्वांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, निम्ननिर्दीष्ट मालमत्ता जमिन मालकांनी त्यांचे मालकीवहिवाटीची व निर्वेध आहे असा निर्वाळा दिला असुन मिळकतींचे सर्व हक्क अधिकारासुध्दा मिळकती कायम खरेदी देणेबाबत त्यांची आमचे अशिलांजवळ बोलणी चालू आहेत. तरी व्यवहारास कायदेशीर बाधा राहू नये व टायटल तपासणीचा भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे. तरी सदर मिळकतींसंदर्भात अन्य कोणास गहाण, दान, बक्षीस, लीन, लीज, अन्नवस्त्र, पोटगी, अदलाबदल, हवा, उजेड, जाणेयेणेचा मार्ग, इजमेंट, वहिवाट, मृत्यूपत्र इ. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांत प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी कळवावे. अन्यथा सदर नोटीस मुदत अखेर कथित हक्क अधिकार जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर येणारे हरकतींचा विचार केला जाणार नाही.

वरीलप्रमाणे नोटीस प्रसिध्द करणेंस येत आहे.

अ) मिळकतीचे वर्णन - मौजे जामगांव, ता. रोहा, जि. रायगड येथील मिळकती, त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे,

| गट नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| २३६ | ०-६०-०० | ०.४९ |
| २३७ | ०-७६-०० | ०.६२ |
| २३८ | ०-१०-०० | ०.०८ |

माणगांव,
दिनांक : २४/१०/२०२४

सही/-
**ॲड. राहुल प्र. ओक**
'मानस', मुंबई - गोवा हायवे
पो. ता. माणगांव, जि. रायगड.
मो.नं. ८८८८३७३००५
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आम्ही याखालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे 'मालमत्ता' असे उल्लेखित) संदर्भामध्ये नवझर जमशेद माणेकशॉ ('मालक') यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सर्व किंवा कोणत्याही व्यक्तीला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये / विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १० (दहा) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

**अनुसूची (मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - टेकाळी, तालुका - अलिबाग, जिल्हा - रायगड येथे स्थित खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग:

| अनु क्रमांक | गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) |
|---|---|---|
| १. | १५ | ००.०१.५० |
| २. | १६ | ००.०१.५० |
| ३. | १७ | ००.१५.५० |
| ४. | १८ | ००.०९.२० |
| ५. | १९ | ००.०८.५० |
| ६. | २० | ००.०७.५० |
| ७. | २१ | ००.०७.०० |
| ८. | २२ | ००.०८.५० |
| ९. | २३ | ००.१०.१० |
| १०. | २६ | ००.०६.०० |
| ११. | २७ | ००.०५.०० |
| १२. | २८ | ००.०८.०० |
| १३. | २९ | ००.०४.०० |
| १४. | ३० | ००.०६.७० |
| १५. | ३१ | ००.०९.५० |
| १६. | ३३ | ००.११.२० |
| १७. | ३४ | ००.०८.५० |
| १८. | ३५ | ००.१५.२० |
| | एकूण | ०१.४३.४० |

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २५/१०/२०२४
झुंजारराव आणि कं. करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

## टेंडर नोटीस

सदर हीराजी–होरमजी, बरीया धर्मशाळा ट्रस्ट तर्फे नोंदणी क्रमांक इ १/ रायगड आहे. जशी आहे तशा परिस्थितीत खालील दिलेली मिळकत विकण्यासाठी काढलेली आहे व त्यासंदर्भात नियम व अटी ट्रस्टींनी खालील प्रमाणे नमुद केलेले आहे. **मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्वे नं. | क्षेत्र हे.आर. पॉ. |
|---|---|---|
| पोयनड, ता. अलिबाग, जि. रायगड | १०२/५ | ०–०२–० पो.ख. ०–०१–० एकूण =०–०३–० |
| | १०५/१ | ०–३१–० पो.ख. ०–०३–० एकूण = ०–३४–० |

सदर वरील दिलेली मिळकत ही हीराजी होरमजी, बारीया धर्मशाळा ट्रस्ट याची असून सदर ट्रस्ट हे धर्मदाय सह. आयुक्त कार्यालयात नोंद असुन त्याचा नोंदणी क्रमांक इ १/रायगड असा आहे.

सदर वरील दिलेली मिळकत ही विकायची असुन इच्छुक निवेददार यांनी त्यांची निवेदा खालील दिलेल्या पत्त्यावर १० दिवसांच्या आत द्यावी. तसेच निवेदा सोबत १०% रक्कम चेक किंवा डी. डी ने ट्रस्टच्या नावे जमा करावी.

सदर निवेदा स्विकारणे अथवा ना कारणे हे ट्रस्टी जवर अवलंबून राहील. सदर सह. धर्मदाय आयुक्त, मुंबई यांची लेखी परवानगी मिळल्या नंतर सदर जागा विकत दिली जाईल. तरी इच्छुक उमेदवारानी वरील दिलेल्या मिळकती संदर्भात त्यांची निवेदा खालील दिलेल्या पत्त्यावर आज दिनांक २४/१०/२०२४ पासून १० दिवसांच्या आत द्यावी त्यानंतर कोणती ही निवेदा स्विकारली जाणार नाही.

स्थळ :– अलिबाग दिनंक :– २४/१०/२०२४

**हीराजी–होरमजी, बारीया धर्मशाळा ट्रस्ट**
गाळा नं. ६, स्वामी बिल्डींग, टाटा टॉवरच्या मागील बाजुस,
रामनाथ रोड, अलिबाग तर्फे ॲडव्होकेट,
**ॲड. डी. डी. शहा.**
शॉ नं. १०३, आदिनाथ शॉपींग सेटर, पहिला मजला, पुणे सातारा रोड, पुणे ३७.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्रं.अपील/डेस्क-१/आरटीएस/रिव्ही/०९/२०२४ दिनांक :-२३.१०.२०२४

## जाहिर नोटीस

प्रति,
श्री. विरल दिनेशकुमार सुखानंदी
रा. मु. रुद्रवली, ता. माणगांव, जि. रायगड ..अर्जदार

विरूध्द

१. श्री कैलास शंकर गोरेगांवकर
२. बयोबाई उर्फ बयव सोन्या म्हशीलकर (मयत) तर्फे वारस
२.१ श्रीमती अनिता सोन्या म्हशीलकर
२.२ श्रीमती संगीता सोन्या म्हशीलकर
२.३ श्री बंडू सोन्या उर्फ संदीप सोनू म्हशीलकर
सर्व रा. माकटी, ता. माणगांव, जि. रायगड सामनेवाले

विषय:- अपर जिल्हाधिकारी रायगड यांचेकडील आदेश क्र.आरटीएस/अपिल/क्र.९८/२०२०, दि १५.०७.२०२२ चे विरुध्द फेरतपासणी अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील अपिल / फेरतपासणी अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १३.११.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास सदरहू अपिल/फेरतपासणी अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव प्रमोद गुहागरकर)**
**नायब तहसिलदार (अपिले)**
**अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग करीता**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. शंकर पिरमल यादव यांनी त्यांचे स्वकष्टार्जित मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांबरोबर केलेली आहेत. मौजे रजपे, कर्जत, जिल्हा रायगड ४१०१०१ येथील शेतजमिन तालुका मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|
| ४५/७ | १.३३.०० जिरायत<br>०.१९.०० पो.ख<br>१.५२.०० एकूण | १.२५ |
| ४१/७/अ | ०.२९.०० जिरायत<br>०.०१.०० पो.ख<br>०.३०.०० एकूण | ०.१९ |

तरी वरील नमुद केलेल्या शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट ताबा बयाणा, पावती साठेकरार खरेदीखत, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे मनाईहुकूम, करारनामा व इतर हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २५/१०/२०२४

सही /-
**ॲड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल
शेजारी, धामोते, नेरळ, ता. कर्जत,
जि. रायगड ४१०१०१, मो. नं. ८३६९२१७३१३

## मे. कार्यकारी दंडाधिकारी साहेब तळा यांचे न्यायालयात
## जाहिर नोटीस मसुदा

श्री. गोविंद पांडूरंग सणस
रा. नानवली, ता. तळा जि. रायगड अर्जदार

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी
गृप ग्रामपंचायत गिरणे त तळे ता. तळा जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा

तमाम जनतेस या जाहिर नोटीसाद्वारे कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार श्री. गोविंद पांडूरंग सणस यांची आई कै. रुक्मणी पांडूरंग सणस यांचा मृत्यू दि. २७/११/२०१३ रोजी मौजे नानवली, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि. २४/०९/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे आईचा मृत्यू दि. २७/११/२०१३ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. गोविंद पांडूरंग सणस यांची आईचा मृत्यू दि. २७/११/२०१३ रोजी मौजे नानवली येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि. १७/१०/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स - २६९०४२
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र.प्रशासन/कात-५/जन्ममृत्यू/जाहिर नोटीस/३४४२/२०२४ दि.१७/१०/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

१. श्री. बबन दाजी शिर्के अर्जदार
रा. वाशी महांगाव, ता. तळा जि.रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी सामनेवाला
गटविकास अधिकारी पंचायत समिती तळा
२. गृप ग्रामपंचायत निगुडशेत ता. तळा जि. रायगड.

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै. दाजी धोंडू शिर्के यांचा मृत्यू दि. १०/०३/२००२ रोजी मौजे वाशी महागांव, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यालयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.०८/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै. दाजी धोंडू शिर्के यांचा मृत्यू दि. १०/०३/२००२ रोजी झाले असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांचे वडील कै. दाजी धोंडू शिर्के यांचा मृत्यू दि. १०/०३/२००२ रोजी मौजे वाशी महागांव येथे झाला असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक १७ ऑक्टोंबर, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**

# झिम्बाब्वेचा विश्वविक्रम

## १२० चेंडूत ३४४ धावा, ३० चौकार आणि २७ षटकार



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अद्भुत अशा फटकेबाजीचं प्रदर्शन करत झिम्बाब्वेने गांबिआविरुध्दच्या टी लढतीत ३४४ धावांचा पर्वतच उभारला. टी प्रकारात कोणत्याही संघाने केलेली ही सर्वोच्च धावसंख्या आहे.

टी २० वर्ल्डकपसाठीच्या आफ्रिका सबरिजनल गटाच्या लढतीत झिम्बाब्वेने हा पराक्रम केला. सिकंदर रझाने अवघ्या ३३ चेंडूत शतक साजरं केलं. त्याने १५ षटकारांसह नाबाद १३३ धावांची खेळी केली. सिकंदरच्या १५ षटकारांसह बाकी फलंदाजांनी मिळून आणखी १२ षटकार चोपले. हाही एक विश्वविक्रम आहे. या प्रचंड लक्ष्याचा पाठलाग करताना गांबिआचा डाव ५४ धावातच आटोपला. झिम्बाब्वेने २९० अशा प्रचंड फरकाने विजय मिळवला. नैरोबीतल्या रुराका स्पोर्ट्स क्लब ग्राऊंडवर झालेल्या लढतीत झिम्बाब्वेच्या फलंदाजांनी चौकार, षटकारांची लयलूट केली. तब्बल ५७ चौकार पाहायला मिळाले.

ब्रायन बेनेटने २६ चेंडूत ५०, तादूवानाशे मारामनीने १९ चेंडूत ६२ धावांची खेळी केली. क्लाईव्ह मदांदेने १७ चेंडूत ५३ धावा फटकावल्या. रायन बर्लने ११ चेंडूत २५ धावा केल्या. गांबिआकडून मुसा जोबारटेहच्या ४ षटकात झिम्बाब्वेने ९३ धावा कुटल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना गांबिआचा डाव ५४ धावांतच आटोपला. झिम्बाब्वेतर्फे रिचर्ड नकाराग्वा आणि ब्रँडन मावुटा यांनी प्रत्येकी ३ विकेट्स पटकावल्या.

गांबियाचा गोलंदाज मोसेस जोबर्टेहने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात महागडा स्पेल टाकला. त्याने आपल्या चार षटकात एकूण ९३ धावा दिल्या आणि त्याला एकही विकेट मिळाली नाही. अजून ७ धावा जर त्याच्या स्पेलमध्ये झिम्बाब्वेने चोपल्या असत्या तर टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये गोलंदाजाने १०० धावा देण्याची ही पहिलीच वेळ ठरली असती. असे असले तरी मुसा



जोबरतेह याचे नाव रेकॉर्ड बुकमध्ये नोंदवण्यात आले आहे. सिकंदर रझाने अवघ्या ३३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते. अशारितीने तो आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा संयुक्त दुसरा फलंदाज बनला आहे. झिम्बाब्वेने या डावात एकूण २७ षटकार मारले होते, जे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच घडले आहे.

# ...आणि के एल राहुलला पाणी आणायला ठेवलं

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर भारत विरुद्ध न्यूझीलंड संघात कसोटी मालिकेतील दुसरा सामना सुरू आहे. या सामन्यासाठी भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तीन मोठे बदल करण्यात आले. के.एल. राहूलला संघात स्थान देण्याबाबत प्रशिक्षक गौतम गंभीरने सकारत्मकता दाखवली होती, मात्र प्रत्यक्षात सामना सुरु झाल्यावर राहुल हा सहकाऱ्यांसाठी पाणी आणताना दिसून आला.

मोहम्मद सिराज, केएल राहुल आणि कुलदीप यादव यांना भारताच्या प्लेइंग इलेव्हनधून बाहेर करण्यात आले. त्यांच्याजागेवर आकाश दीप, वॉशिंग्टन सुंदर आणि शुभमन गिल यांना प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी देण्यात आली. दरम्यान, यातील केएल राहुलला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर केले जाईल याबाबत गेल्या अनेक दिवसांपासूनच चर्चा होती. केएल राहुलची कामगिरी गेल्या काही दिवसात चांगली झाली नव्हती. बंगळुरूला झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यातही त्याने 0 आणि १२ धावा केल्या होत्या.

आजपासून भारत-न्यूझीलंड दुसरा कसोटी सामना. त्यातच पहिल्या सामन्यात शुभमन गिल दुखापतीमुळे खेळला नव्हता, तर सर्फराजने दुसऱ्या डावात दीडशतकी खेळी केली होती. त्यामुळे गिल दुसऱ्या सामन्यातून पुनरागमन करेल आणि सर्फराजही त्याची जागा कायम करेल, असेच चित्र दिसत होते. त्यामुळे केएल राहुलला प्लेइंग इलेव्हनमधील जागा गमवावी लागेल, असे अंदाज अनेकांनी लावले होते. मात्र, या सामन्याला सुरुवात होण्याच्या आदल्या दिवशी म्हणजेच बुधवारी भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने या सर्व चर्चांना खोडून काढताना म्हटले, सोशल मिडिया प्लेइंग इलेव्हन इलेव्हन ठरवू शकत नाही. हो केएल राहुलला मोठ्या धावा करायच्या आहेत आणि आमचे संघव्यवस्थापन त्याला पाठिंबा देण्याचा विचार करत आहे. गंभीरने असे भाष्य केल्यानंतर मात्र केएल राहुल संघात कायम राहू शकतो, अशी चर्चा पुन्हा सुरू झाली होती. परंतु, नाणेफेक न्यूझीलंडने जिंकल्यानंतर भारताचा कर्णधार रोहित शर्माने संघ घोषित केला, तेव्हा त्याने तीन बदल झाल्याचं सांगितलं. यानंतर सामना सुरू झाल्यावर ड्रिंक्स ब्रेकदरम्यान केएल राहुल मैदानात खेळाडूंसाठी पाणी आणतानाही दिसला. या सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांनी प्लेइंग इलेव्हनमध्ये मॅट हेन्रीच्या जागेवर मिचेल सँटेनरला संधी दिली आहे.



# ऑस्ट्रेलियाच्या हॉकी संघाने बुधवारी भारतीय हॉकी संघाचा विजयरथ रोखला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

डायकिन स्ट्रेंजर याने झळकावलेली दमदार हॅट्रिक व पॅटट्रिक अँड्र्यू याने केलेल्या एक गोलच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने भारतीय संघावर ४-0 असा दमदार विजय साकारला.

पराभवानंतरही भारतीय हॉकी संघ सुल्तान ऑफ जोहोर हॉकी करंडकाच्या गुणतालिकेत नऊ गुणांसह पहिल्या स्थानावर कायम आहे. डायकिन स्ट्रेंजर याने ३३व्या, ३९व्या व ५३व्या मिनिटाला गोल करीत ऑस्ट्रेलियाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. पॅटट्रिक अँड्र्यूयाने २९व्यामिनिटाला गोल केला. भारताकडून एकाही हॉकीपटूला गोल करता आला नाही. या पराभवाआधी भारतीय हॉकी संघाने जपान, ग्रेटब्रिटन व मलेशिया तीनही देशांना पराभूत करताना उल्लेखनीय खेळ केला होता. भारतीय संघ नऊ गुणांसह पहिल्या स्थानावर असून न्यूझीलंडचा संघ आठ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.



ऑस्ट्रेलियन संघ सात गुणांसह तिसऱ्या स्थानावर असून ग्रेटब्रिटनचा संघ सात गुणांसह चौथ्या स्थानावर आहे.जपानचा संघ पाचव्या व मलेशियाचा संघ अखेरच्या अर्थातच सहाव्या स्थानावर आहे. या स्पर्धेची अखेरची फेरी २५ ऑक्टोबरला होणार आहे.

# आमिर खानच्या ‘दंगल’ने २००० कोटी कमावले

## आम्हाला फक्त...; बबीता फोगाटचा मोठा खुलासा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट अभिनेता आमिर खान याचा दंगल चित्रपट बॉक्स ऑफिसवर सुपर-डुपर हिट ठरला होता. या चित्रपटाने जगभरात २००० कोटीची कमाई केली. या चित्रपटामुळे फोगाट कुटुंबालाही प्रसिद्धी मिळाली. दंगल चित्रपटात महावीर फोगाट आणि त्यांच्या मुली गीता, बबीता यांची कहाणी दाखवण्यात आली आहे. या चित्रपटाबाबत आता बबीता फोगाटने मोठा खुलासा केला आहे. दंगल चित्रपटाने २००० कोटी कमावले पण फोगाट कुटुंबाला फक्त एक कोटी रुपये देण्यात आले होते, असा खुलासा बबीता फोगाटने केला आहे.



**आमिर खानच्या ‘दंगल’ने कमावले २००० कोटी आम्हाला फक्त**

बबिता फोगटला एका मुलाखतीमध्ये विचारण्यात आलं होतं की, दंगल चित्रपटाने २००० कोटी रुपये कमावले, तर फोगट कुटुंबाला फक्त १ कोटी रुपये मिळाले का? यावर बबिता फोगटने, हो असे उत्तर दिलं. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धमाका केला. चित्रपटाने कोट्यवधींचा गल्ला जमावल्यानंतर फोगट कुटुंबाला केवळ १ कोटी रुपये मिळाल्याने निराश झाले का असा प्रश्नही तिला यावेळी विचारण्यात आला. यावर बबिता म्हणाली की, तिच्या कुटुंबाचं ध्येय प्रेम आणि आदर मिळवणं आहे. न्यूज२४ ला दिलेल्या मुलाखतीत बबीता फोगाटने हा खुलासा केला आहे.

**दंगल चित्रपटाबाबत बबीता फोगाटचा मोठा खुलासा**

**भारताची माजी कुस्तीपटू बबीता फोगाटने कुस्तीतून निवृत्ती घेत राजकारणात प्रवेश केला आहे. दरम्यान, आता बबीता फोगाट हिने दंगल चित्रपटाबाबत मोठा खुलासा केला आहे. बबीता फोगाटने म्हटलं आहे की, दंगल चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर २००० कोटींहून अधिक कमाई केली होती. पण, फोगाट कुटुंबाला निर्मात्यांकडून फक्त एक कोटी रुपये मोबदला मिळाला होता. हा चित्रपट त्यांच्या आयुष्यातील घटनांवर आधारित आहे.**

दंगल चित्रपट २०१६ मध्ये रिलीज झाला. या चित्रपटाने भारतात ३८७.३९ कोटी रुपयांची कमाई केली. चित्रपटाचं बजेट अंदाजे ९० कोटी होतं, त्यापैकी ७० कोटी रुपये निर्मितीवर आणि २० कोटी रुपये प्रमोशन आणि मार्केटिंगवर खर्च करण्यात आले होते. या चित्रपटाने केवळ भारतात २९७.३९ कोटी रुपयांचा नफा कमावला होता आणि या व्यतिरिक्त जगभरात या चित्रपटानं कोट्यवधींचं कलेक्शन केलं. यामुळेच हा चित्रपट ब्लॉकबस्टर हिट मानला गेला होता. या चित्रपटाची कथा महिला कुस्तीमध्ये जागतिक दर्जाचा ठसा उमटवणाऱ्या महावीर सिंह फोगाट आणि त्यांच्या मुली गीता आणि बबिता फोगट यांच्यावर आधारित होती. दंगल हा भारतीय सिनेमाचा सर्वात मोठा हिट मानला जातो आणि यामध्ये आमिर खानचा दमदार अभिनय आणि फोगाट कुटुंबाची प्रेरणादायी कथा या दोन्हींचा मोठा वाटा आहे.

# विश्वविजेत्यांकडून भारतीय हॉकी संघाचा पराभव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

विश्वविजेता व पॅरिस ऑलिंपिकमधील रौप्यपदक विजेता जर्मनीच्या पुरुष हॉकी संघाने बुधवारी यजमान भारतीय हॉकी संघावर २-0 असा विजय साकारला. या विजयासह जर्मनीने दोन आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेत १-0 अशी आघाडी घेतली. हेनरिक मर्टगेन्स व लुकास वाईंडफेडर यांनी जर्मनीसाठी विजयी गोल करीत ठसा उमटवला.



भारतीयहॉकीपटूंनामिळालेल्या सात पेनल्टी कॉर्नरवर गोल करता आला नाही.जर्मनीच्या हॉकीपटूंनी पहिल्या लढतीच्या सुरुवातीलाच भारतावर वर्चस्व गाजवले. हेनरिक मर्टगेन्स याने सर्कलमधून भारतीय संघाचा बचाव भेदला. त्याने मारलेला फटका क्रिशन पाठक अडवू शकला नाही. जर्मनीने १-0 अशी आघाडी घेतली. यानंतरही जर्मनीचा संघ आघाडी वाढवण्यासाठी प्रयत्न करीत होता. शेवटी पहिल्या क्वॉर्टरच्या मध्यानंतर भारतीय हॉकीपटूंनी गोल करण्यासाठी धडपड केली. पेनल्टी कॉर्नरही मिळाला. वरुणकुमारला याचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही. पहिल्या क्वॉर्टरमध्ये जर्मनीकडे १-0 अशी आघाडी कायम राहिली. पेनल्टीस्ट्रोकवायादुसऱ्याक्वॉर्टरमध्ये भारतीय हॉकीपटूंनी आक्रमक खेळ केला. बरोबरी साधण्यासाठी प्रयत्न केले. याचदरम्यान भारतीय हॉकी संघाला तीन पेनल्टी कॉर्नर मिळाले. संजय, अमित व हरमनप्रीत या तीनही खेळाडूंना भारतासाठी गोल काही करता आले नाही.एवढेच नव्हे तर हे क्वॉर्टर संपायला तीन मिनिटे बाकी असताना भारतीय संघाला पेनल्टी स्ट्रोकही मिळाला. हरमनप्रीतला यावरही गोल करता आला नाही. जर्मनीचा गोलरक्षक जोशुआ ऑनयेक्यू याचा बचाव अभेद्य राहिला.

बचाव भेदला ३0 व्या मिनिटाला लुकास वाईंडफेडर याने गोलरक्षक सूरज करकेरा व जरमनप्रीत सिंग यांच्यामधून चेंडू गोलजाळ्यात पाठवला आणि जर्मनीला दुसरा गोल करून दिला. जर्मनीसाठी हा गोल विजयी ठरला. यानंतर दोन्ही संघाला गोल करता आले नाही.आता उभय देशांमधील दुसरा सामना गुरुवारी खेळवण्यात येणार आहे. यजमान भारतीय हॉकी संघाला या लढतीत विजय मिळवावा लागणार आहे. अन्यथा, मिलिकेवर पाणी सोडावे लागेल.

# क्षितिजाची कुस्तीत ‘सुवर्ण’ हॅट्ट्रिक

**खोपोली** : राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा २०२४-२५ परभणी येथे संपन्न झाली. या स्पर्धेत मुंबई विभागाचे नेतृत्व करताना रायगडच्या क्षितिजा पूजा जगदीश मरागजे हिने सलग तिसऱ्यांदा सुवर्ण पदक मिळवत नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

क्षितिजा ही कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार कुस्ती संकुलाची महिला मल्ल असून राजाराम कुंभार, राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, दिवेश पालांडे, विजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वयाच्या आठव्या वर्षापासून कुस्तीचा सराव करत आहे. ती खोपोली कारमेल कॉन्व्हेंट स्कूलची विद्यार्थीनी आहे. तिला क्रीडा शिक्षक जगदीश मरागजे, समीर शिंदे, जयश्री नेमाने यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# खराब प्रकाशामुळे मीरपूर कसोटी स्टंप्स

## बांगलादेशकडे ८१ धावांची आघाडी, मेहदी-जेकरचे अर्धशतक; स्कोअर २८३/

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मीरपूर कसोटीच्या तिसऱ्या दिवशी बांगलादेशने दुसऱ्या डावात ८१ धावांची आघाडी घेतली आहे. कालच्या १०१ धावांच्या पुढे संघाने बुधवारी खेळण्यास सुरुवात केली. खराब प्रकाशामुळे तिसऱ्या दिवशीचे स्टंप्स करण्यात आले.

कागिसो रबाडाने सर्वाधिक ४ बळी घेतले. त्याच्याशिवाय केशव महाराजने ३ बळी घेतले. अष्टपैलू मेहिदी हसन मिराज आणि झाकेर अली यांनी बांगलादेशच्या ढासळत्या डावाचा ताबा घेतला. एकवेळ संघाने १०६ धावांत पाच विकेट गमावल्या होत्या. यानंतर दोघांनी मिळून १३८ धावा जोडल्या. केशव महाराजने ही भागीदारी तोडली. त्याने ५८ धावांच्या स्कोअरवर झाकेर अलीला एलबीडब्ल्यू आऊट केले.



मेहदी हसन मिराज ८७ धावा करून नाबाद आहे. मीरपूर कसोटीच्या दुसऱ्या दिवशी बांगलादेशने दुसऱ्या डावात ३ गडी गमावून १०१ धावा केल्या आहेत. सलामीवीर महमूद हसन ४0 आणि मुशफिकर रहीम ३३ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले. मंगळवारी सकाळी दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात २०२ धावांची आघाडी घेतली होती. प्रोटीज संघ ३०८ धावा करून सर्वबाद झाला.

संघाने कालच्या १४० धावांच्या पुढे खेळण्यास सुरुवात केली आणि यष्टीरक्षक फलंदाज काइल व्हेरिनने झळकावलेले शानदार शतक आणि विआन मुल्डरच्या अर्धशतकामुळे ३०८ धावा झाल्या. बांगलादेशकडून तैजुल इस्लामने ५ बळी घेतले. तर हसन महमूदने ३ आणि मेहदी हसन मिराजला २ बळी मिळाले.

## इमर्जिंग आशिया कपमध्ये भारताचा सलग तिसरा विजय

# ओमानचा भारताकडून ६ गडी राखून पराभव

**। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।**

उदयोन्मुख आशिया चषक स्पर्धेत भारत अ संघाची उत्कृष्ट कामगिरी कायम आहे. तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील संघाने आता तिसऱ्या सामन्यात ओमानचा ६ गडी राखून पराभव केला.संघाचा हा सलग तिसरा विजय आहे. गट फेरीअखेरपर्यंत संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर राहिला.बुधवारी अल अमेरत क्रिकेट मैदानावर ओमानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत भारताला १४१ धावांचे लक्ष्य दिले. प्रत्युत्तरात भारतीय संघाने १५.२ षटकांत ४ गडी गमावून लक्ष्य गाठले.

भारताकडून आयुष बडोनीने २७ चेंडूत ५१ धावांची सर्वोच्च खेळी खेळली. कर्णधार तिलक वर्माने नाबाद ३६ धावा केल्या. सलामीवीर अभिषेक शर्माने ३४ धावांचे योगदान दिले.भारतीय संघ ओमानला ऑलआऊट करू शकला नाही. ओमानने २0 षटकांत ५ गडी गमावून १४0 धावा केल्या.

मोहम्मद नदीमने सर्वाधिक ४१ धावांची खेळी खेळली. हम्माद मिर्झाने २८ धावांचे योगदान दिले. भारताकडून आकिब खान, रशिख दार, निशांत संधू, रमणदीप आणि साई किशोर यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.भारत अ संघाने दुसऱ्या



सामन्यात यूएईचा ७ गडी राखून पराभव केला. सोमवारी यूएईचा कर्णधार बसील अहमदने ओमानमधील अल अमेरत क्रिकेट मैदानावर नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. भारताकडून अभिषेक शर्माने अर्धशतक झळकावले तर रसिक सलामने ३ बळी घेतले.

भारतीय संघाने अप्रतिम गोलंदाजी करत यूएईला १६.५ षटकांत १०७ धावांवर सर्वबाद केले. भारत अ संघाकडून रसिक सलामने सर्वाधिक तीन, तर रमणदीपने दोन बळी घेतले. भारताने १०८ धावांचे लक्ष्य १०.५ षटकात ३ गडी गमावून पूर्ण केले. आयुष बडोनीने चौकार मारून सामना जिंकला.भारत-अ ने त्यांच्या पहिल्या सामन्यात पाकिस्तान-अ संघाचा ७ धावांनी पराभव केला. शनिवारी ओमानमधील अल अमेरत क्रिकेट मैदानावर भारतीय कर्णधार तिलक वर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.टीम इंडियाने २0 षटकांत ८ विकेट गमावून १८३ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ २0 षटकांत ७ गडी गमावून केवळ १७६ धावा करू शकला. कर्णधार तिलक वर्माने ४४ धावा केल्या होत्या. अंशुल कंबोजने सर्वाधिक ३ बळी घेतले.

# वेस्ट इंडिजने श्रीलंकेला दिले १९० धावांचे लक्ष्य

**। पल्लेकेल । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिज आणि श्रीलंका यांच्यातील दुसरा एकदिवसीय सामना पल्लेकेले येथे खेळला जात आहे. वेस्ट इंडिजने श्रीलंकेला १९0 धावांचे लक्ष्य दिले आहे.

संघाच्या वतीने शेरफेन रदरफोर्डने शानदार फलंदाजी करत कारकिर्दीतील तिसरे वनडे अर्धशतक झळकावले. याशिवाय डावखुरा फिरकी गोलंदाज गुडाकेश मोतीनेही अर्धशतक ठोकले. श्रीलंकेकडून वनिंदू हसरंगाने सर्वाधिक ४ बळी घेतले. महिष तीक्षणा, आशिथा फर्नांडोने ३-३ गडी बाद केले.

वेस्ट इंडिजकडून रदरफोर्डने सर्वाधिक ८0 धावा केल्या. रदरफोर्डचे हे सलग दुसरे अर्धशतक आहे. पहिल्या सामन्यातही त्याने अर्धशतक झळकावले होते. त्याच्याशिवाय गुडाकेश मोतीने ५0 धावांची नाबाद खेळी खेळली. दोघांमध्ये ९व्या विकेटसाठी ११९ धावांची भागीदारी झाली.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या वेस्ट इंडिज संघाची सुरुवात खराब झाली. १७ धावांवर संघाने पहिली विकेट गमावली. तिसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर तीक्षणाने अलिक अथनाजेला बाद केले.

अथनाजेला केवळ १ धाव करता आली. दुसरा धक्का १७ धावांच्या स्कोअरवरही बसला. ब्रँडन किंग १६ धावा करून बाद झाला. चौथी विकेट केसी कार्टीच्या रूपाने पडली. तो ६ धावा करून बाद झाला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)